19 July 2026 page 01_Layout 1 7/18/2026 8:12 PM Page 1

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

रविवार १९ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १९९ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 19 July 2026 | Year : 6 | Issue : 199 | Daily | Rate: Rs. 5/-




**दि. १९ जुलै २०२६**



१९२६- राजरत्न मुलाचे निधन.
१९३७- कॉंग्रेस सरकारने मंत्रिमंडळ बनविले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून शपथविधी
नागपूर येथे शे.का.फे.महिला परिषद.
१९४२- भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर.
१९४६- बंगाल मधून घटना समितीवर डॉ बाबासाहेब आंबेडकरांची निवड.

संकलन प्रा. यशवंत दुपटे



# सरकारची दडपशाही सुरूच

## सोनम वांगचुक यांना जंतर-मंतरवरून उचलून नेले!

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटीच्या प्रकरणावरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत २० दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेल्या सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी आंदोलनस्थळावरून उचलून नेले. शनिवारी सकाळी पोलिसांनी ही कारवाई करत त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या कारवाईदरम्यान आंदोलनस्थळी प्रचंड तणाव निर्माण झाला होता. कॉकरोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत या कारवाईला तीव्र विरोध केला.

शनिवारी सकाळच्या दिल्ली पोलिसांचे एक पथक साध्या वेशात जंतर-मंतरवर दाखल झाले. कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक झालेल्या या कारवाईमुळे आंदोलनस्थळी एकच गोंधळ उडाला. आंदोलकांनी आणि कार्यकर्त्यांनी पोलिसांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलीस सोनम वांगचुक यांच्याभोवती पांढऱ्या चादरी घेऊन उभे राहिले जेणेकरुन कोणालाही आत काय सुरुय हे दिसणार नाही. या पांढऱ्या चादरींच्या आडून पोलिसांनी अत्यंत वेगाने वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून बाहेर काढले आणि गाडीत बसवून रुग्णालयात दाखल केले.

सोनम वांगचुक यांना रुग्णालयात हलवल्यानंतर जंतर-मंतरवर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या कारवाईबाबत स्पष्टीकरण देताना दिल्ली पोलिसांनी सांगितले की, ₹माननीय हायकोर्टाच्या आदेशाचे पालन करत आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसारच ही कारवाई करण्यात आली आहे. सोनम वांगचुक यांची प्रकृती सातत्याने खालावत असल्यामुळे त्यांना आवश्यक त्या वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.₹

यासोबतच पोलिसांनी जंतर-मंतरवरील इतर आंदोलकांना हे ठिकाण शांततापूर्ण मार्गाने रिकामे करण्याचे आवाहन केले आहे. कारवाईदरम्यान आंदोलकांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे किरकोळ वाद झाला. मात्र पोलिसांनी अत्यंत संयम बाळगत ही प्रक्रिया पार पाडली, असेही पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, या संपूर्ण घडामोडींच्या आधी, म्हणजेच

### CJP कडून देशव्यापी आंदोलनाची हाक

गेल्या २१ दिवसांपासून शांततेत सुरू असलेल्या जंतर मंतर येथील बेमुदत उपोषणाला आज वेगळं वळण लागलं. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी सोनम वांगचुक यांनी उपोषण केले, परंतु, पोलिसांनी आज त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केलं. पोलिसांच्या या कृतीमुळे कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी संताप व्यक्त केला असून त्यांनी आता देशभर आंदोलनाची हाक दिली आहे. यासंदर्भातील त्यांनी व्हिडिओ शेअर केला आहे.

अभिजीत दिपके म्हणाले, "दिल्ली पोलिसांनी सोनम वांगचुक यांना जंतर मंतर येथून हलवलं आहे. येथे विद्यार्थ्यांवरही लाठीचार्ज करण्यात आलाय. मी फ्रेश होण्याकरता मित्राच्या घरी गेलो होतो. तिथेही मला पोलिसांनी मारून रोखून ठेवलं होतं. मला ताब्यात ठेवण्यात आलं होतं. मला आता सोडण्यात आलं असून जंतर मंतर येथे आम्हाला जाऊ दिलं जात नाहीय."

अभिजीत दिपकेंनी देशभरातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचं आवाहनही केलं आहे. त्यांनी देशभर आंदोलन करण्याची हाक दिली आहे. ते म्हणाल, "देशभरातून जितके लोक हा व्हिडिओ पाहात आहेत, त्यांना मी आवाहन करतो की, देशभरात आज शांततापूर्वक आंदोलन करायचं आहे. सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने जंतर मंतर येथून हलवण्यात आलं आहे. मला मारहाण केली आहे, विद्यार्थ्यांवरही लाठीचार्ज केला आहे. तुम्ही राहता त्या विभागात शांततेत आंदोलन करा. कोणताही नियम मोडू नका. विद्यार्थ्यांवरील हल्ला सहन केला जाणार आहे. सोनम वांगचुक २० दिवस उपाशी आहेत, त्यांना पोलिसांनी जबरदस्तीने उठवलं आहे."

### वांगचुक रुग्णालयात अभिजीत दिपकेंचं बेमुदत उपोषण सुरू



जंतर-मंतर येथे गेल्या २१ दिवसांपासून बेमुदत उपोषणाला बसलेले कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी शनिवार सकाळी रुग्णालयात दाखल केलं. त्यामुळे या आंदोलनाला पूर्णविराम मिळणार अशी शंका निर्माण झालेली असतानाच अभिजीत दिपके यांनी बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी शनिवारी बेमुदत उपोषणाला बसणार असल्याची घोषणा केली. "मी आजपासून अनिश्चित काळासाठी उपोषण सुरू करत आहे. मी सर्वांना आवाहन करतो मागे हटू नका; हे आंदोलन आणखी मोठंच होईल. त्यांनी एक मोठी चूक केली आहे... मी सर्वांना जंतर मंतर येथे येण्याचं आवाहन करतो; आपलं आंदोलन येथून पुढे सुरू राहील आणि २० जुलै रोजी नियोजित असलेला आपला मोर्चा आपण पुढे नेऊ", असं अभिजीत दिपके म्हणाले.

शुक्रवारी उशिरा रात्री जंतर-मंतरवर सोनम वांगचुक यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याचा खळबळजनक आरोप कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दीपके यांनी केला.

दीपके यांनी म्हटले की, काही समाजकंटकांनी जंतर-मंतरवर सोनम सरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर काहीतरी वस्तू फेकण्यात आली, पण सुदैवाने त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही. आंदोलन विस्कळीत करण्यासाठी काही लोकांना पाठवले जाणार असल्याची पूर्वकल्पना मला पोलिसांनीच दिली होती. जंतर-मंतरवर शांततेत सुरू असलेले आंदोलन मोडीत काढण्याचा हा ठरवून केलेला कट आहे. जर सोनम सरांना काही झाले, तर त्याला पूर्णपणे सरकार जबाबदार असेल.

सोनम वांगचुक आणि त्यांच्या समर्थकांनी आपल्या मागण्यांसाठी २० जुलै रोजी संसदेवर धडक मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. या नियोजित मोर्चाच्या अवघ्या दोन दिवस आधीच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन रुग्णालयात हलवले आहे. शुक्रवारी डॉक्टरांनी केलेल्या तपासणीनुसार, उपोषणामुळे वांगचुक यांचे वजन ५६.५५ किलोपर्यंत घटले होते. त्यानंतर आता वांगचुक यांना रुग्णालयात हलवण्यात आले. सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात नेण्यात आले आहे. त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे.

### सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीबाबत आली महत्त्वाची अपडेट



गेल्या २० दिवसांपासून त्यांनी अन्नत्याग गेल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक झाली होती. ते तिसऱ्या टप्प्यात पोहोचले आहेत, अशी प्रतिक्रिया त्यांच्यावर जंतर मंतर येथे उपचार केलेल्या डॉ. सतीश लांबा यांनी दिली. तर, रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांच्या पुढील उपचारानंतर पोलिसांनीही त्यांच्या प्रकृतीविषयी सविस्तर माहिती दिली आहे. ते पुढे म्हणाले, "डॉक्टरांनी वांगचुक यांच्या आरोग्याची तपासणी केली असून, दीर्घकाळ उपवास केल्यामुळे ते अशक्त झाले आहेत आणि त्यांच्यामध्ये डिहायड्रेशनची (पाणी कमी होण्याची) लक्षणे दिसत असल्याचं मत डॉक्टरांनी सांगितलं आहे. ते सध्या निरीक्षणाखाली आहेत. त्यांची पुढील वैद्यकीय चाचणी केली जात असून तज्ज्ञांच्या देखरेखीखाली त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवलं जात आहे." दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून सोनम वांगचुक यांच्यावर आंदोलनस्थळीच वैद्यकीय उपचार सुरू आहेत. डॉ. सतीश लांबा यांच्या पथकाने त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवलं होतं. याबाबत डॉ. सतीश लांबा म्हणाले, "आज सकाळी साडेसात मला फोन आला की सोनम वांगचूक यांना जबरदस्तीने एका सरकारी रुग्णालयात नेण्यात आलं आहे. त्यांना भेटायला दिलं गेलं नाही. त्यांच्यावर उपचार सुरू असलेल्या वैद्यकीय कक्षाबाहेर जे काही डॉक्टर होते, त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर समजलं की आजच्या चाचण्यांतून त्यांच्यात पोटॅशिअम कमी असल्याचं समोर आलं आहे. परंतु त्यांची प्रकृती स्थिर आहे. काल सायंकाळी त्यांची शुगर ६० ते ८० mg/dL च्या दरम्यान होती. आज Hypokalemia सारखी परिस्थिती आहे. पोटॅशिअम कमी झाल्यामुळे ही स्थिती निर्माण होते. यामुळे हृदयाच्या कंपनावरही परिणाम होऊ शकतो. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे ते सध्या निगराणीखाली असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे."

### वांगचुक यांना अटक करणं ही सरकारची चूक : राहुल गांधी



केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीत चाललेल्या आंदोलनप्रकरणी अखेर खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. सोनम वांगचुक यांना अटक केल्यानंतर त्यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. सोनम वांगचुक यांना अटक करणं ही सरकारची चूक असल्याचं त्यांनी म्हटलंय. "मोदी सरकारच्या मुख्य तत्त्वांमध्ये असत्य आणि हिंसा यांचा समावेश आहे. सोनम वांगचुक शांततापूर्ण उपोषणावर असताना त्यांना जंतरमंतरवरून हटवणं चुकीचं आहे", असं राहुल गांधी म्हणाले. "पेपर लीक, शिक्षणाचा वाढता खर्च आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्या या भारताच्या भविष्यासाठी अत्यंत गंभीर समस्या आहेत. कोणत्याही प्रकारची बळजबरी भारताच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या व विश्वास ठेवणाऱ्या आम्हा सर्वांना हे मुद्दे मांडण्यापासून रोखू शकत नाही", असंही राहुल गांधी म्हणाले.

### रुग्णालयात असूनही सोनम वांगचुक उपोषणावर ठाम



सोनम वांगचुक यांना रुग्णालयात नेले असले तरीही त्यांचं उपोषण सुरूच राहणार असल्याचं त्यांच्या पत्नी गीतांजली जे. आंगमो यांनी सांगितलं आहे. आपल्या उपोषणाच्या २१ व्या दिवशी, पोलिसांनी वैद्यकीय सल्ला आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा हवाला देत वांगचुक यांना रुग्णालयात हलवलं. सोनम वांगचुक एकदम ठीक आहेत, परंतु वारंवार विनंती करूनही सफदरजंग रुग्णालयाने त्यांच्या वैद्यकीय अहवालाच्या प्रती देण्यास नकार दिला आहे, असं त्यांच्या पत्नी गीतांजली जे. आंगमो यांनी सांगितलं. तसंच, नियोजित संसदेवरील मोर्चा त्यांच्या सहभागासह पुढे जाईल, असा दावाही त्यांनी केला. वृत्तानुसार, सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली आंगमो यांनी सफदरजंग रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांना पत्र लिहून म्हटलं आहे की, त्यांच्या संमतीशिवाय सोनम वांगचुक यांना तोंडावाटे किंवा सलाइनद्वारे कोणताही पदार्थ किंवा द्रवपदार्थ देऊ नये. तसंच, सफदरगंज रुग्णालयात करण्यात आलेल्या चाचण्यांवर विश्वास न ठेवता सोनम वांगचुक यांच्या पत्नी पुन्हा एकदा नव्याने त्यांच्या रक्ताचे नमुने घेऊन खासगी लॅबमध्ये चाचणी करणार आहेत.तसंच, आंगमो म्हणाल्या की, वांगचुक यांनी इलेक्ट्रोलाइट पावडर घेण्यास नकार दिला आणि आपलं उपोषण सुरूच ठेवलं आहे. "सोनम वांगचुक यांनी २० दिवसांपासून उपोषण सुरू केले असून अजूनही सुरूच आहे. डॉक्टरांनी त्यांना इलेक्ट्रोलाइट पावडर देण्याबद्दल सांगितलं, पण त्यांनी नकार दिला. त्यांचं उपोषण अजूनही सुरूच आहे", असं त्या म्हणाल्या. तसंच, २० मार्च रोजी संसद मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चाला सोनम वांगचुक पोहोचू शकले नाही तर, या मोर्चाचं नेतृत्त्व मी करणार आहे, असंही सोनम वांगचुक यांच्या पत्नीने स्पष्ट केलं.

### अभिजीत दिपके यांच्यावर महिलेने फेकली शाई



दिल्लीतील जंतर-मंतरवर कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दिपके यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे. याच दरम्यान एक धक्कादायक घटना घडली आहे. एका महिलेने अभिजीत दिपके यांच्यावर शाई फेकली, ज्यामुळे आंदोलनस्थळी एकच गोंधळ उडाला. मात्र तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी तत्परता दाखवत त्या महिलेला पकडलं आणि पोलिसांच्या स्वाधीन केलं. सध्या पोलीस या महिलेची कसून चौकशी करत आहेत.

आपल्यावर शाई फेकल्याच्या या घटनेनंतर अभिजीत दिपके यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X'वर एक पोस्ट शेअर केली आहे. ₹निळा माझा आवडता रंग आहे₹ असं म्हटलं. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना दिल्लीपोलिसांनी ताब्यात घेऊन उपचारासाठी सफदरजंग रुग्णालयात दाखल केलं आहे. यानंतर अभिजीत दिपके यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे.

## ज्येष्ठ समाजवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन



### सामाजिक चळवळीतील एक प्रेरणादायी पर्व संपले

**पुणे :** ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, गांधीवादी नेते आणि 'युवक क्रांती दल' (युक्रांद)चे संस्थापक व माजी आमदार डॉ. कुमार सप्तर्षी (वय ८५) यांचे पुण्यात शनिवारी (दि.१८) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या समाजवादी चळवळीतील एक अभ्यासू, प्रखर आणि मूल्यनिष्ठ नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांचे पार्थिव सोमवारी (दि.१८) कोथरूड येथील गांधी भवन येथील गांधी स्मारक भवन येथे ठेवण्यात येणार आहे.

डॉ. कुमार सप्तर्षी यांनी महाराष्ट्रात समाजवादी विचारसरणी रुजविण्यासाठी आणि युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. १९६०-७० च्या दशकात त्यांनी 'युवक क्रांती दल' (युक्रांद)ची स्थापना करून युवकांना संघटित केले. या संघटनेतून महाराष्ट्राला अनेक अभ्यासू, संवेदनशील आणि संघर्षशील कार्यकर्ते मिळाले. ते गांधीवादी आणि समाजवादी विचारधारेचे खंदे पुरस्कर्ते होते. सामाजिक विषमता, अन्याय, भ्रष्टाचार आणि लोकशाही मूल्यांच्या ऱ्हासाविरोधात त्यांनी सातत्याने आवाज उठविला. सत्याग्रह, लोकसहभाग आणि विधायक परिवर्तन या तत्त्वांवर त्यांचा ठाम विश्वास होता.

डॉ. सप्तर्षी हे प्रभावी लेखक, अभ्यासू वक्ते आणि विचारवंत म्हणूनही ओळखले जात होते. त्यांनी 'सत्याग्रही विचारधारा' या मासिकाचे संपादक म्हणून काम करत समाजप्रबोधनाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विविध सामाजिक, राजकीय आणि वैचारिक विषयांवरील त्यांचे लेखन अभ्यासकांसाठी मार्गदर्शक ठरले. ते गेल्या



काही वर्षांमध्ये विविध विषयांवर सडेतोड भूमिका मांडत होते.












# उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम
## वास्तववादी साहित्याच्या पाऊलखुणा

भर उन्हात ज्वालांचे शेले पांघरून गुलमोहरासारखे बहरणारे आंबेडकरी कवी डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम यांचे 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' हे समीक्षापर पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. त्यानिमित्ताने हा संक्षिप्त अभिप्राय. डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्या 'उद्ध्वस्त माणसाच्या कविता' आणि 'लॉकडाऊन' कवितासंग्रहाच्या मूल्यांकनाचे, दोन्ही कवितासंग्रहावर आलेल्या अभिप्रायांचे, विश्लेषणांचे संपादकीय अतिशय प्रामाणिक आणि आत्मकथनात्मक आहे. खूप भावनिक, प्रेरणादायी आणि सामाजिक जाणिवेचे आहे. महेंद्रकुमार मेश्राम यांनी आपल्या जीवनातील संघर्ष, गरिबी, जातीय वेदना, उद्ध्वस्तता यातून ते कसे कवितेकडे वळले, याची सविस्तर कहाणी सांगितली आहे. डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संविधान आणि क्रांतिकारी विचार यांचा गाढा प्रभाव दिसतो. महेंद्रकुमार यांच्यासाठी कविता केवळ भावनिक अभिव्यक्ती नाही, तर सामाजिक शस्त्र आहे.




'उद्ध्वस्त माणसाच्या कविता' (२०१५) - वैयक्तिक आणि सामाजिक वेदना, दारिद्र्य, अन्याय यावर काव्यबद्ध आहे. 'लॉकडाऊन' (२०२०) - कोविड-१९ काळातील मानवी एकाकीपणा, भीती, प्रश्न आणि समाजातील विषमता यावर आधारित आहे. अनेक नामवंत साहित्यिक, समीक्षक, कवी आणि संस्थांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिक्रिया, पुरस्कार आणि पाठिंब्याचा डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांनी आपल्या मनोगतात उल्लेख केला आहे. हे त्यांच्या प्रयत्नांना बळकटी देणारे आहे. त्यांच्या मनोगतात महेंद्रकुमार मेश्राम स्वतःला साहित्यशास्त्राचा अभ्यासक नसल्याचे सांगतात, तरीही अनुभव आणि भावना यावर आधारित लिखाण चालू ठेवल्याचे सांगताहेत, ही नम्रता आणि प्रामाणिकपणा महेंद्रकुमार यांच्या मजकुराला आकर्षक बनवते.

|| डॉ. गंगाधर मेश्राम
मो. 9869504996 ||

भाषा सरळ, स्पष्ट आणि हृदयस्पर्शी आहे. साहित्यिक भाषेची दिखाऊपणा न करता, अनुभव बोलतात. वाक्यरचना वाचकाला सहजपणे जोडते. काही ठिकाणी भावनिक तीव्रता जाणवते, विशेषतः उद्ध्वस्तता आणि लॉकडाऊनच्या काळातील वेदनेच्या वर्णनात ती अधिक जाणवते. 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' मधील मजकूर दलित-बहुजन साहित्य आणि प्रतिरोधी काव्य परंपरेचा भाग वाटतो. लेखक केवळ कविता लिहित नाहीत तर आपल्या जीवनातील वास्तवाला कागदावर उतरवतात. अशा प्रकारचे साहित्य वाचकाला लेखकाशी भावनिक संबंध जोडण्यास मदत करते आणि पुस्तक वाचण्याची उत्सुकता वाढवते. प्रामाणिकता, सामाजिक बांधीलकी, सातत्य आणि संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देणारा हा संदेश आहे. 'उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम' हा केवळ संपादकीय संकलन नाही, तर एक सामाजिक दस्तऐवज आहे. जो मराठी साहित्यातील 'उद्ध्वस्त' आणि 'वंचित' आवाजाला बळ देणारा आहे. डॉ. महेंद्रकुमार मेश्राम यांच्यासारख्या कवींच्या लिखाणामुळेच साहित्य अधिक सर्वसमावेशक आणि वास्तववादी होत जाते. हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप हार्दिक सदिच्छा! उजेडवास्तवाचे क्रांतिसंग्राम.●●

संपादक - डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम
प्रकाशक - स्तंभ पब्लिशिंग हाऊस, चंद्रपूर
मुखपृष्ठ - संतोष घोंगडे
मूल्य - २०० रुपये

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि राजकीय परिवर्तनासाठी उभारलेल्या संस्था आज गंभीर संकटातून जात आहेत. रिपब्लिकन पक्ष, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, पीपल्स एज्युकेशन सोसायटी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी यांसारख्या संस्थांमध्ये निर्माण झालेला अंतर्गत संघर्ष, गटबाजी आणि स्वार्थी नेतृत्व समाजासाठी चिंतेचा विषय ठरला आहे. या परिस्थितीला केवळ काही व्यक्ती नव्हे, तर नेतृत्व, कार्यकर्ते, समर्थक आणि मुकदर्शक राहिलेला समाजही काही प्रमाणात जबाबदार आहे.**

# सर्वच संस्थांना ग्रहण लागले...




एक जुनी गोष्ट आहे. लाकूडतोड्या ज्या फांदीवर बसला होता तीच फांदी तो तोडत होता. लोकांनी त्याला सावध केले, पण त्याने ऐकले नाही. फांदी तुटली आणि तो स्वतःही खाली पडला. आज आपल्या संस्थांची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. ज्यांनी या संस्था उभ्या केल्या त्यांच्या विचारांपासून आपण दूर गेलो आणि संस्था कमकुवत होत गेल्या.

रिपब्लिकन पक्षाची स्थापना समाजाच्या राजकीय सक्षमीकरणासाठी झाली; परंतु स्थापनेनंतर लवकरच गटबाजी सुरू झाली. त्यानंतर विभाजनांची मालिका थांबली नाही. व्यक्तिपूजा, अहंकार आणि जातीय उपविभागांच्या राजकारणामुळे समाजाची एकजूट ढासळली. पुढे अनेक नवीन संघटना निर्माण झाल्या; पण त्यांच्यातही फुट पडली. परिणामी समाजाचा संघटनांवरील विश्वास कमी झाला.

भारतीय बौद्ध महासभेचीही अशीच अवस्था झाली. धम्मकार्यापेक्षा राजकीय निष्ठा आणि व्यक्तिपूजा महत्त्वाची ठरू लागली. अनेक गटांनी स्वतंत्र महासभा स्थापन केल्या. पदांची संख्या वाढली, पण काम कमी झाले. डॉ. बाबासाहेबांच्या नावाचा वापर प्रतिष्ठेसाठी झाला; परंतु धम्मप्रसार आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा दुय्यम ठरली. समता सैनिक दलातही अनेक गट निर्माण झाले. प्रत्येक गट स्वतःलाच मूळ संघटना म्हणू लागला. एकसंघ होण्याची तयारी दिसली नाही. संघटनेपेक्षा व्यक्ती मोठी ठरू लागली. परिणामी समाजहितापेक्षा गटहिताला प्राधान्य मिळाले. पीपल्स एज्युकेशन सोसायटीसारख्या शिक्षण संस्थेतही नेतृत्वाचे वाद, अनेक गट आणि न्यायालयीन संघर्ष यामुळे संस्थेच्या प्रतिष्ठेला धक्का बसला. विद्यार्थ्यांचे आणि समाजाचे हित बाजूला पडले. शिक्षणाचा वारसा जपण्याऐवजी संस्थांवर नियंत्रण मिळविण्याची स्पर्धा सुरू झाली. दीक्षाभूमी ही केवळ ऐतिहासिक स्मारक नाही, तर जगभरातील बौद्धांची श्रद्धास्थळी आहे. अशा ठिकाणीही वाद, आरोप-प्रत्यारोप आणि सत्तासंघर्ष सुरू राहिल्यास त्याचा विपरीत संदेश समाजात आणि जगभर पोहोचतो. मतभेद संवादातून सोडविण्याऐवजी संघर्षाचा मार्ग स्वीकारल्याने संस्था अधिक कमकुवत होतात.

**लेखांक164**



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

या सर्व परिस्थितीमागे अहंकार, स्वार्थ, लोभ, व्यक्तिपूजा आणि संवादाचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत. मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु त्यांचे रूपांतर वैरात होऊ नये. बुद्धांनी मैत्री, करुणा आणि संवादाचा मार्ग दिला, तर डॉ. बाबासाहेबांनी संघटन, शिक्षण आणि विवेक यांचा आग्रह धरला. आपण या मूल्यांपासून दूर गेलो आहोत.

समाजाने व्यक्तीपेक्षा संस्था आणि संस्थेपेक्षा धोरण यांना महत्त्व दिले पाहिजे. कोणत्याही संघटनेची ओळख एका व्यक्तीपुरती मर्यादित राहू नये. नेतृत्व बदलले तरी संस्था सक्षमपणे चालली पाहिजे. तरुणांना संधी देणे, नवीन नेतृत्व घडविणे आणि चुका मान्य करून त्यात सुधारणा करणे ही काळाची गरज आहे. मुकदर्शक राहणारे लोकही चुकीच्या प्रवृत्तीला अप्रत्यक्ष पाठबळ देतात. त्यामुळे चुकीला वेळेवर विरोध करणे, योग्य नेतृत्वाला साथ देणे आणि विधायक टीका करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे निराश होऊन समाजविघातक शक्तींच्या प्रभावाखाली जाण्याऐवजी संयम राखून योग्य पर्याय उभे करणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या संस्था या समाजाच्या स्वाभिमानाचे प्रतिक आहेत. त्या टिकविण्याची आणि सक्षम करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. व्यक्तिपूजा, गटबाजी आणि स्वार्थ यांचा त्याग करून समन्वय, संवाद, पारदर्शकता आणि बुद्धिप्रामाण्यवाद स्वीकारला, तरच या संस्थांना नवसंजीवनी मिळेल. अन्यथा डॉ. बाबासाहेबांनी उभा केलेला अमूल्य वारसा आपल्या हातून नष्ट झाल्याचा कलंक इतिहासात आपल्या पिढीवर राहील.●●

---

# श्रमिक वर्गाचा संघर्ष मांडणारा कवितासंग्रह
## आयुष्य : एक युद्ध

कवी संजय गोडघाटे यांचा 'आयुष्य : एक युद्ध' हा कवितासंग्रह ठसा प्रकाशनगृह, नाशिक यांनी प्रकाशित केला आहे. हा संग्रह वाचताना त्याचे शीर्षक अत्यंत समर्पक वाटते. कारण सर्वसामान्य श्रमिक, कष्टकरी, वंचित आणि मजूर वर्गाचे आयुष्य हे खऱ्या अर्थाने संघर्षमय युद्धच आहे. या जीवनसंघर्षातील वेदना, आशा, स्वप्ने, पराभव आणि जिद्द यांचे प्रभावी चित्रण कवीने अत्यंत साध्या, सरळ पण हृदयस्पर्शी भाषेत केले आहे.

या कवितासंग्रहाचा केंद्रबिंदू म्हणजे श्रमिक वर्ग. त्यांच्या कष्टमय जीवनातील वास्तव, शोषण, असुरक्षितता आणि उपेक्षा कवीने संवेदनशीलतेने मांडली आहे. समाजातील संपन्न वर्गाने वंचित समाजापासून दूर गेलेल्या वास्तवाकडे लक्ष वेधत कवी शोषितांच्या वेदनांना शब्द देतो. त्याच्या कवितेत कृत्रिमता नसून अनुभवाची प्रामाणिकता आहे 'विजू मिस्त्री' ही कविता या संग्रहातील सर्वाधिक प्रभावी कवितांपैकी एक आहे. स्वतःप्रमाणे मुलाने मजुरी करू नये, तो शिकून अधिकारी व्हावा, अशी स्वप्ने पाहणाऱ्या एका मिस्त्रीची कहाणी कवीने मर्मस्पर्शी शब्दांत मांडली आहे. मात्र बांधकामावरील अपघातात विजूचा मृत्यू होतो आणि त्याची स्वप्नेही कोसळतात. त्यानंतर त्याची मुलेच विटा आणि सिमेंट उचलण्याचे काम करू लागतात. आता त्याची मुले -

'रेती-सिमेंटचा गारा ओढतात,
डोईवरून विटा वाहतात,
स्वतःसह बापालाही जगवतात.'

या काही ओळी संपूर्ण श्रमिक वर्गाच्या वेदनेचे प्रतिनिधित्व करतात. 'दहशत' या कवितेत कवीने मुलीच्या सुरक्षेबाबत प्रत्येक बापाच्या मनातील अस्वस्थता अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केली आहे. मुलीचा 'पप्पा, पुलावर येताना पेट्रोल संपले' हा साधा फोन येताच एका हातात पेट्रोलची बाटली आणि दुसऱ्या हातात हॉकी स्टिक घेऊन धावणारा बाप आजच्या असुरक्षित समाजव्यवस्थेचे भयावह वास्तव अधोरेखित करतो. या कवितेतून स्त्रीसुरक्षेचा गंभीर प्रश्न अत्यंत संयतपणे मांडला आहे. संग्रहात पर्यावरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरण यांवरीलही विचारप्रवर्तक कविता आहेत. 'मी, माझा मुलगा आणि नातू' या कवितेत कवी स्वतःची चूक मान्य करत पुढील पिढीला झाडे लावण्याचा संदेश देतो.

'एक चूक होऊन गेली,
अंगणात झाड लावायचे,
राहून गेलं.'

तर 'मी, ती आणि पाखरं' या कवितेत जंगलतोडीमुळे पक्ष्यांचे हरवलेले निवासस्थान आणि पर्यावरणीय असंतुलनाची वेदना व्यक्त होते. 'या मुलांनी काय केले?' या कवितेत आदिवासी, गरीब आणि वंचित मुलांच्या शिक्षणापासून वंचित राहण्याच्या शोकांतिकेकडे कवी लक्ष वेधतो. भीक मागणारी, मजुरी करणारी किंवा चोरीकडे ढकलली गेलेली ही मुले समाजाच्या अपयशाचे प्रतिक असल्याचे तो सुचवतो.

'ही उद्याची झाडं देतील,
फळ-फूल-सावली,
या मुलांनी काय केले,
मुळंच छाटली.'

या ओळी समाजाच्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देतात. 'डिस्टोपिया' या कवितेत सत्तेची लालसा, बेरोजगारी, महागाई, जागतिकीकरण आणि कोरोनानंतरचे सामाजिक वास्तव यांचे चित्रण आहे. भांडवलशाहीच्या वाढत्या प्रभावामुळे सर्वसामान्य माणूस यंत्रवत होत चालल्याची खंत कवी व्यक्त करतो. संग्रहातील 'कहाणी' ही कविता कवीच्या स्वतःच्या जीवनाशी निगडित आहे. गॅस सिलेंडर वाहणारा कामगार आणि कविमनाचा माणूस म्हणून त्याचा अनुभव या कवितेतून उलगडतो. श्रीमंतांच्या नजरेत स्वतःकडे पाहताना होणारी वेदना आणि त्याचवेळी कवितेमुळे मिळालेली आत्मिक श्रीमंती यांचा सुंदर मिलाफ येथे दिसतो.

'सर, तुमच्या नाश्त्याच्या वेळी,
नेमका गॅस संपलेला असतो,
आणि त्याच वेळी,मी सिलेंडर घेऊन,
तुमच्या दारात येतो.'

ही कविता श्रमाचे मूल्य आणि माणुसकीचा खरा अर्थ अधोरेखित करते. संग्रहाची शेवटची 'चल ये!' ही कविता आशावादाने परिपूर्ण आहे. निराशेऐवजी संघर्ष, आत्मविश्वास आणि परिवर्तनाचा संदेश देत कवी म्हणतो'

'तुझी हिंमत तुझी ढाल,
क्रांतिगीत तुझे बोल;
तूच मोती, तूच परिस,
तुझी किंमत रे अनमोल.'




हा संदेश संपूर्ण संग्रहाचा आशय अधिक प्रभावी करतो.

या संग्रहाला डॉ. मिलिंद बागुल, अजीम नवाज राही आणि अर्जुन डांगळे यांसारख्या मान्यवर साहित्यिकांच्या प्रस्तावना व अभिप्रायांची जोड लाभली आहे. त्यांनी संजय गोडघाटे यांच्या कवितेतील अनुभवसंपन्नता, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली आहे. बुद्धभूषण साळवे यांनी साकारलेले मुखपृष्ठ आणि रेखाचित्रे संग्रहाच्या आशयाला पूरक ठरतात. एकूण ७५ कवितांचा हा संग्रह श्रमिक वर्गाच्या जीवनसंघर्षाचा जिवंत दस्तावेज आहे. अलंकारिक शब्दांचा आडंबर न करता वास्तववादी अनुभवांना काव्यरूप देण्याची ताकद संजय गोडघाटे यांच्या लेखणीत आहे.

|| माया वासनिक गेडाम
मो. 8007850656 ||

'आयुष्य : एक युद्ध' हा कवितासंग्रह सामाजिक जाणीव, मानवी संवेदना आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारा असून कवी, अभ्यासक, समीक्षक आणि सर्वसामान्य वाचकांनी अवश्य वाचावा असा आहे. कवी संजय गोडघाटे यांच्या पुढील साहित्यप्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.●●

कवितासंग्रह : 'आयुष्य : एक युद्ध'
कवी : संजय गोडघाटे
प्रकाशन : ठसा प्रकाशन गृह नाशिक
पृष्ठसंख्या : १३२
किंमत : २५०₹
पहिली आवृत्ती : २५ डिसेंबर २०२५

---

# कृतिशील व्यक्तिमत्त्व
## विजयभाऊ गजभिये

माणसाचे व्यक्तिमत्त्व केवळ बाह्य रूपावरून ठरत नाही, तर त्याचे आचार, विचार, कार्य आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यावरून त्याची खरी ओळख निर्माण होते. अशाच सेवाभावी, निगर्वी आणि कृतिशील व्यक्तिमत्त्वाचे धनी म्हणजे विजयभाऊ रामाजी गजभिये. वयाची पंचाहत्तरी गाठल्यानंतरही ते शैक्षणिक, सहकार आणि धम्म चळवळीत निःस्वार्थपणे कार्यरत आहेत. माझा विजयभाऊंशी परिचय त्यांच्या आणि माझे ज्येष्ठ बंधू स्वर्गीय प्रा. पृथ्वीराज बनसोड यांच्या मैत्रीतून झाला. १९७२-७३ मध्ये मॉरिस कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थी परिषद निवडणुकीत त्यांनी माझ्या बंधूंना निःस्वार्थपणे सहकार्य केले. विद्यार्थीदशेपासूनच त्यांच्यात सामाजिक जाणीव आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. नागपूर येथे भरलेल्या इंडियन सायन्स कॉंग्रेसच्या अधिवेशनावेळी विद्यार्थ्यांच्या आंदोलनातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. शैक्षणिक कारकीर्दीनंतर विजयभाऊंनी पंचशील विद्यालय, नागपूर येथे शिक्षक म्हणून कार्य केले. अध्यापनाबरोबरच अनेक गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक मदत करून त्यांनी त्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यशस्वी झाले. नागपूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक मनोज सांगोळे हे त्यांच्याच विद्यार्थ्यांपैकी एक उल्लेखनीय उदाहरण आहे.

सेवानिवृत्तीनंतर विजयभाऊंनी सहकार चळवळीत स्वतःला पूर्णवेळ वाहून घेतले. उमरेड परिसरात सहकाराची भावना रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या अथक परिश्रमातून गिरड रोड, उमरेड येथे प्रेरणा नगरी तसेच सेलिब्रेशन हॉल आणि लॉनची उभारणी झाली. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना संघटित प्रयत्नांचे महत्त्व समजले. धम्म चळवळीतही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. दीक्षाभूमी, नागपूर येथील वंदना संघाच्या माध्यमातून ते अनेक वर्षांपासून धम्मकार्य करीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या धम्माचरणाच्या संदेशानुसार ते आजही दर रविवारी नियमितपणे दीक्षाभूमीवर जाऊन धम्मसेवेत सहभागी होतात. वयाच्या पंचाहत्तरीनंतरही त्यांचा उत्साह आणि समाजकार्यातील सातत्य प्रेरणादायी आहे.

|| धर्मेंद्र बनसोड
मो.9890094397 ||



१९ जुलै २०२६ रोजी विजयभाऊंचा अमृतमहोत्सव साजरा होत आहे. या निमित्ताने त्यांचा होणारा सत्कार हा केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून समाजसेवा, शिक्षण, सहकार आणि धम्मकार्य यांना दिलेली आदरांजली आहे. त्यांच्या कार्याचा व्यापक प्रभाव आणि समाजातील सन्मान याची साक्ष या सोहळ्याला उपस्थित राहणारे विविध क्षेत्रांतील मान्यवर देतील. बनसोड मित्र परिवार, प्रा. पृथ्वीराज बनसोड प्रतिष्ठान आणि पीपल्स वेलफेअर सोसायटी, नागपूर यांच्या वतीने विजयभाऊ गजभिये यांना अमृतमहोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा. त्यांना निरोगी, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्याकडून समाजसेवेचे हे कार्य असेच अखंड सुरू राहो, हीच सदिच्छा!●●

---

# प्रबोधनाची मशाल
## फुले - आंबेडकरी साहित्य संमेलन आणि लोकांची भूमिका

फुले-आंबेडकरी साहित्य संमेलने ही केवळ साहित्यिक मेळावे नसून सामाजिक परिवर्तन, वैचारिक प्रबोधन आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांचा प्रसार करणारी प्रभावी चळवळ आहे. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मानवतावादी विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ही संमेलने सातत्याने करीत आहेत. वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजघटकांच्या भावना, संघर्ष, अनुभव आणि आकांक्षा साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर मांडण्याचे कार्यही या व्यासपीठावरून घडते. आजच्या काळात जातीयता, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता, असहिष्णुता आणि खोट्या माहितीचे वाढते जाळे समाजासमोर मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत फुले-आंबेडकरी साहित्य संमेलने विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधाननिष्ठा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव जागविणारे प्रभावी माध्यम ठरत आहेत. समाज परिवर्तनाची सुरुवात विचारांपासून होते आणि त्या विचारांना जनमानसापर्यंत पोहोचविण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे साहित्य. फुले-आंबेडकरी साहित्य संमेलने या विचारांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देतात. येथे कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, संशोधनपर लेख, व्याख्याने, परिसंवाद, पुस्तक प्रकाशन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर सखोल चर्चा घडवून आणली जाते. या संमेलनांमधून जातीय विषमता, स्त्री-पुरुष समानता, शिक्षण, बेरोजगारी, शेतकरी, आदिवासी, कामगार, पर्यावरण, संविधान आणि मानवी हक्क यांसारख्या विषयांवर विधायक संवाद घडतो. नवोदित लेखक, कवी, संशोधक आणि विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळते. तसेच वाचन संस्कृतीला चालना मिळून समाजात चिकित्सक विचारसरणी विकसित होते.




महाराष्ट्रात अनेक दशकांपासून विविध सामाजिक आणि साहित्यिक संस्थांच्या माध्यमातून फुले-आंबेडकरी साहित्य संमेलने आयोजित केली जात आहेत. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक शहरांमध्ये व ग्रामीण भागात ही परंपरा सातत्याने जोपासली जात आहे. या संमेलनांमधून अनेक नवोदित साहित्यिक घडले असून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला नवी दिशा मिळाली आहे. आज या चळवळीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपले स्थान निर्माण केले आहे. विविध राज्यांबरोबरच परदेशातही आंबेडकरी विचारांवर आधारित साहित्य संमेलने आयोजित होत आहेत. त्यामुळे समता, सामाजिक न्याय आणि संविधाननिष्ठ विचारांचा प्रसार जागतिक स्तरावर होत आहे. फुले-आंबेडकरी साहित्य संमेलनांचे यश केवळ आयोजकांवर अवलंबून नसून समाजातील प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागावर अवलंबून आहे. प्रत्येकाने प्रबोधनपर साहित्याचे नियमित वाचन करून आपली विचारशक्ती विकसित करावी. साहित्य संमेलनांमध्ये सहभागी होऊन व्याख्याने ऐकावीत, चर्चांमध्ये सहभागी व्हावे आणि विधायक प्रश्न विचारावेत. समाजातील अन्याय, विषमता, संघर्ष, प्रेरणादायी घटना आणि सकारात्मक बदल यांवर लेखन करून सामाजिक परिवर्तनाला हातभार लावणे हीही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आजच्या डिजिटल युगात सामाजिक माध्यमांचा विधायक वापर करून संविधान, महापुरुषांचे विचार, चांगली पुस्तके आणि प्रबोधनपर साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. पालक आणि शिक्षकांनी मुलांना लहानपणापासून वाचनाची सवय, संविधानाची ओळख आणि महापुरुषांच्या विचारांचा संस्कार दिल्यास संवेदनशील, विवेकी आणि जबाबदार नागरिक घडतील. महात्मा फुले यांनी शिक्षणक्रांती घडवली, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मशाल प्रज्वलित केली, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची अंमलबजावणी केली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा भक्कम पाया रचला. या महान विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी कार्य फुले-आंबेडकरी साहित्य संमेलने करीत आहेत. आज माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात खोटी माहिती, अंधश्रद्धा आणि द्वेषपूर्ण प्रचार यांचा प्रभाव वाढत असताना विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधाननिष्ठ विचार अधिक व्यापक करण्याची गरज आहे. या दृष्टीने फुले-आंबेडकरी साहित्य संमेलने सामाजिक प्रबोधनाची अखंड मशाल म्हणून कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक विचारांचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. वाचन, चिंतन, लेखन आणि सामाजिक सहभाग यांच्या माध्यमातून समतामूलक, न्याय्य, विवेकवादी आणि संविधाननिष्ठ समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे. फुले-आंबेडकरी साहित्य संमेलने ही केवळ साहित्याची परंपरा नसून सामाजिक परिवर्तन, लोकजागृती आणि मानवी मूल्यांच्या संवर्धनाची प्रभावी चळवळ आहे. 'वाचू, विचार करू, लिहू आणि समाजपरिवर्तनासाठी कार्य करू' हा संकल्प स्वीकारणे हीच या साहित्य चळवळीची खरी प्रेरणा आणि समाजाप्रती असलेली ऐतिहासिक जबाबदारी आहे.●●

|| शिवा प्रधान
मो.7057605968 ||

---

# काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

### एस आय आर

एस आय आर सुरू झाले, मतदान फार्म भरा,
ही प्रक्रिया लयी भारी गांभीर्याने विचार करा.
गूगल मध्ये जाऊन, इसीआईनेट लोड करावे,
2002 च्या यादीत, आपले नाव शोध घ्यावे,
नसल्यास आई बाबा, आजोबा आजी नामी,
प्रोजेनी मॅपिंगसाठी, हे नाते येती कामी,
पहिल्याच रकान्यात, सिम्पल मैपिंग नोंद करा.
एस आई आर सुरू झाले, मतदान फॉर्म भरा.....
वोटर च्या ईपीक वरुनी, बीएलओ शोध करावे,
पुढील प्रकियेसाठी, सदा संपर्कात रहावे,
बीएलओ हा केंद्रबिंदू, या संपूर्ण प्रक्रियेचा,
बीएलओची मदत घ्या, फॉर्म भरू नका चुकीचा.
हलक्यात घेऊ नका, हा राज आहे गहरा..
एस आई आर सुरू झाले, मतदान फार्म भरा....
फार्म भरले नाही, नाव वगळले जाईल,
यादीत नाव नाही, नागरिकत्व गळले जाईल.
बिहार बंगाल मधे झाले, ते ईथेही होईल,
सरकारी सुविधा बंद, मतदान हक्क जाईल .
ही कशाची नांदी समजुन घ्या इशारा.
एसआईआर सुरू झाले,मतदान फॉर्म भरा...

– चित्तरंजन चौरे

### समतेचा आरसा

विश्व फिफा सामने बल्याढ्य फुटबॉल संघाचे
प्रमाण आहे जगात समता नांदत असल्याचे
गोऱ्यात निग्रो तर गोरेही दिसतात निग्रोत
समतेमुळे विश्वास निर्माण होतो एकमेकात
समतेने बंधुता येउन देशास मिळतो सन्मान
सन्मानाची किमत फेडतात ते मेडल आणुन
छ्यात्तर वर्षांनंतरही कां होत नाही क्वॉलिफॉय
समता आणि सन्मान हीच असावी मुख्य हाय
खेळाडुच्या सन्मानापेक्षा भारी होते राजकारण
मेडल प्राप्त महीला मल्लांचे आहे उदाहरण
जे देश पुढे आहेत त्यांनी प्रथम समता पेरली
या समतेनेच त्यांची अर्थव्यवस्था सुदृढ केली
जागतिक स्तरावर विश्वगुरु बनायचे असल्यास
अर्थव्यवस्था नव्हे समताच आहे एकमेव निकष

– इंजि .नरेंद्र ताकसांडे

### झोपलेल्या मूडध्याना जागवशील का सांग ना !

धर्म जातीचे रोपटे फुलवू नको तू अंगणी
मानवता हाच धर्म, सर्वांच्या जागव मनी.
अंधाराच्या मरणाचा
पश्चाताप नको रे बाळगा
झोपलेल्या मुडद्यांना जागवशील का, सांग ना?

स्वप्ने रक्तबंबाळ झाली, तडपली रस्त्यावरी;
गोठलेल्या स्वप्नांना
घेऊ कशी भरारी?
वाळवंटातही फुलेल का
स्वप्नांची बाग, बोल ना;
झोपलेल्या मुडद्यांना जागवशील का, सांग ना?

विवेकाला गुंगीत ठेवून,
असहिष्णुतेचा फुलोरा बांधून,
लोपली संस्कृती क्रूर
विकृतीचा जन्म झाला
त्याला आवर घालशील का, सांग ना?
झोपलेल्या मुडद्यांना
जागवशील का, सांग ना?

– ज्योत्स्ना बनसोड

### पावसाची पहिली सर

पावसाच्या पहिल्या सरीने
वातावरणात चैतन्य आणले,
उकाड्याने सुस्त झालेल्या
मनांमध्ये एक अस्वस्थ
उत्साह जागृत केला.
त्यामुळे आराम मिळाला
आणि आपण सहन केलेल्या
घामाच्या त्रासाची जागा घेतली.
हे मान्य आहे की,
ती थोडी उशिरा आली;
तरीही, यात निसर्गाचा
दोष नव्हता
मानवी चुकीमुळेच
या घटनाक्रमाला
सुरुवात झाली होती
हे निसर्गाचे चक्र आहे,
जे अविरतपणे फिरत असते;
सूर्यप्रकाशानंतर पाऊस येतो
आणि जगात नवचैतन्य
निर्माण करतो तरीही,
मानवतेकडे पाहा:
ती स्वत: निसर्गालाच
हानी पोहोचवते,
विचार न करता झाडे तोडते
आणि डोंगर फोडते,
यालाच प्रगती समजून
एक प्रकारे स्वत:च्याच
पायावर कुऱ्हाड चालवते.
त्याला कोण समजावू शकेल?
तो स्वत:ला शहाणा समजतो;
तरीही, जेव्हा निसर्ग
त्याच्या विरोधात जातो,
तेव्हा तो आकाशाकडे पाहत,
पावसाची वाट
बघत तळमळतो
पण त्याला असे आढळून
येते की कोणताही
देव, अल्लाह किंवा मसीहा
त्याच्या मदतीला येत नाही
त्या क्षणी, तो आतल्या आत रडतो,
जणू काही तो आपल्याच
देवाची परीक्षा घेत आहे.
दीपक म्हणतो:
₹निसर्गावर झालेल्या
जखमांकडे लक्ष द्या;
ऊन आणि सावलीचे चक्र
विस्कळीत करू नका.
पाऊस झाडांशी बांधलेला आहे;
त्यांच्याशिवाय प्रत्येक
मानवी श्वास अपूर्ण राहतो.₹

– डॉ. दिपक बारसागडे

### पाऊस खेळतो लपंडाव

पाऊस खेळतो लपंडाव शेतीत बियाणे सडतात
राव पेरणीचा जमेना मेळ शेतकर्याच्या जिवाचं खेळ..
बियाणे झाले महाग मजूरी झाली
महाग सरकार देईना साथ रीकामे शेतकर्या चे साथ..
सावकार आदळतो फास आत्महत्या ती हमखास जरी,
बियाणे उबगुन गेले तरि, पिक उत्पादन चीआस..
शेतात घाम गाळतो शेतकरी पोशिंदा जगाचा संकटावर मात करीत
सरकार देतो हातावर तुरी माणूसा माणसा जागा हो जरी..
शेतीच्या मालाला भाव द्या शेतकर्यांचे कष्टाला मोल द्या
माणूस म्हणून साथ द्या माणवता तुमच्यात दिसू द्या..
कितीही असू आम्ही ₹दांभिकर उजळमाथांनी मिरवती
जनतेस न्याय नाही जनतेच्या अपेक्षा पायाखाली तुडवती..

– इंजि. शुद्धोधन बडवणे

### तुकोबानं न्याहाळलं नसतं का अवकाश

तुकोबानं न्याहाळलं नसतं का अवकाश
त्याच्या दुर्बिणीतून?
गॅलिलिओच्या आधी खरं तर
त्यानेच शोधले असते गुरूचे चार ग्रह
पण, तुम्ही त्याला वैकुंठापार काही शोधूच दिलं नाही!
नामदेवानं का नसतं मांडलं
सजीवांचं विज्ञान?
डार्विनआधी खरं तर त्यानंच
उलगडली असती मानवी उत्क्रांतीची प्रगती
पण, तुम्ही त्याला खऱ्याचं काही बोलूच दिलं नाही!
जनाबाई का कमी होती
त्या मेरी क्युरीहून?
तिनंच तर स्त्रीमुक्तीचं रेडियम इथं आरपार सोडलं
तिला कुठे अशक्य होता रसायनांचा प्रयोग?
पण, तुम्ही तिच्या डोईचा पदर खांद्यावर येऊच दिला नाही!
ज्ञानदेवाच्या मतीबाहेर
कुठे होतं गुरुत्वाकर्षण?
न्यूटनआधी नसती का मांडली
त्यानं
आधुनिक विज्ञानाची ज्ञानेश्वरी?
पण तुम्ही या भिताड व्यवस्थेला
त्याला प्रश्नच विचारू दिला नाही!
चोखोबा काय एडिसनहून
कमी थोर होता काय?
त्यालाही पाडता आलाच असता प्रकाश
दलितांसह सवर्णांच्याही घरात...
पण, तुम्ही त्याच्या दिव्याला साधं तेलही मिळू दिलं नाही!
माणसाला माणसांत आणण्यातच गेली यांची ऊर्जा,
ज्ञानाचा मक्ता सोडवण्यातच गेली उभी हयात!
तुम्ही यांना कधी बडवलं, कधी बुडवलं...
पण, यांच्या अंतरीचा धावा पाहा,
सत्यशोधनाची वारी यांनी कधीच चुकवली नाही....



– उमेश चित्ते

19 July 2026 page 03-1_Layout 1 18-07-2026 05:01 PM Page 1



# आंबेडकरी माणूस !

**समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत मूल्यांचा पुरस्कार करणारा माणूस म्हणजे आंबेडकरी माणूस. तो जात, धर्म, पंथ किंवा अंधश्रद्धेपेक्षा माणुसकी, विज्ञाननिष्ठा आणि संविधाननिष्ठेला प्राधान्य देतो.**

अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, शिक्षणाचा प्रसार करणे, सामाजिक समता प्रस्थापित करणे आणि प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष करणे ही त्याची ओळख आहे. म्हणूनच आंबेडकरी विचारांचा माणूस समाजात वेगळा आणि उठून दिसतो. खरे तर 'आंबेडकरी माणूस नावाने नव्हे, तर विचार आणि कृतीने ओळखला जातो.' महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला विवेक, विज्ञाननिष्ठा आणि मानवतेचा वारसा तो जपतो. कोणत्याही गोष्टीचा स्वीकार केवळ परंपरा म्हणून न करता तर्क, पुरावा आणि विज्ञानाच्या कसोटीवर करणे ही त्याची भूमिका असते. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग झपाट्याने बदलत आहे. माणूस चंद्रावर पोहोचला, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करू लागला, माहितीचे जग एका क्लिकवर उपलब्ध झाले. मात्र या प्रगतीसोबत एक वेदनादायक वास्तवही दिसते -माणूस माणसापासून दूर जात आहे. श्रद्धा वाढत आहे; पण संवेदना कमी होत आहेत. देवळे भव्य होत आहेत; पण माणुसकीची मंदिरे ओस पडत आहेत. श्रद्धा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे. मात्र देवाची पूजा करणारा माणूस जिवंत माणसाच्या दुःखाकडे दुर्लक्ष करत असेल, तर त्या श्रद्धेचे मूल्य काय? मंदिरात लाखो रुपयांच्या देणग्या दिल्या जातात; पण गरीब, आजारी किंवा उपाशी माणसाला मदतीचा हात देण्यासाठी अनेकदा कोणी पुढे येत नाही. आंबेडकरी विचार याच विसंगतीवर प्रश्न उपस्थित करतो.

आजही समाजात प्रतिकांना अधिक महत्त्व दिले जाते. दगडातील देवाची पूजा केली जाते; पण जिवंत माणसाचा अपमान केला जातो. जिवंत असताना आई-वडिलांकडे दुर्लक्ष करणारे अनेक जण त्यांच्या निधनानंतर मोठमोठे स्मृतिदिन साजरे करतात. प्रत्यक्षात आई-वडिलांना जिवंतपणी दिलेला सन्मान, प्रेम आणि सेवा हीच सर्वात मोठी पूजा आहे. वृद्धाश्रमांची वाढती संख्या समाजातील बदलत्या मूल्यांची साक्ष देते. ज्यांनी आयुष्यभर आपल्या मुलांसाठी कष्ट घेतले, त्यांनाच शेवटच्या काळात एकटेपणाचा सामना करावा लागतो. कोणत्याही धार्मिक विधीपेक्षा पालकांची सेवा आणि त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे अधिक श्रेष्ठ आहे. आंबेडकरी विचार केवळ सामाजिक समतेपुरता मर्यादित नाही; तो श्रमाचा सन्मान शिकवतो. प्रत्येकाला अन्न हवे असते; पण शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या कष्टाची खरी किंमत समाज देत नाही. प्रत्येक घासामागे शेतकऱ्याचा घाम आहे, याची जाणीव ठेवून त्याचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे. पाणी, पर्यावरण आणि निसर्ग संवर्धन हीदेखील आजची मोठी गरज आहे. प्रत्येकाला सावली हवी असते; पण झाडे लावणे आणि जगविण्यासाठी फार कमी लोक पुढे येतात. पाण्याचा अपव्यय थांबवणे, वृक्षसंवर्धन करणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे ही केवळ सरकारी जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. स्त्री-पुरुष समानता हे आंबेडकरी विचारांचे आणखी एक महत्त्वाचे मूल्य आहे. प्रत्येकाला घरात सून हवी असते; पण मुलगी जन्माला यावी, अशी मानसिकता अजूनही सर्वत्र दिसत नाही. ही विषमता संपल्याशिवाय खरी सामाजिक समता निर्माण होणार नाही. मुलगा आणि मुलगी समान आहेत, हा विचार कृतीत उतरवणे आवश्यक आहे. आज शिक्षणाचा प्रसार झाला आहे; पण मूल्यांचे शिक्षण कमी झाले आहे. पदव्या वाढल्या, पैसा वाढला; मात्र माणुसकी, सहिष्णुता आणि सामाजिक बांधिलकी कमी होताना दिसते. म्हणूनच शिक्षणासोबत विवेक, नैतिकता आणि संविधानातील मूल्येही जोपासली पाहिजेत. आंबेडकरी माणूस अन्यायाविरुद्ध निःसंकोचपणे उभा राहतो. जातीय भेदभाव, शोषण, अंधश्रद्धा, स्त्रीद्वेष आणि असमानता यांना तो ठाम विरोध करतो. तो कोणत्याही व्यक्तीचा द्वेष करत नाही; मात्र अन्याय करणाऱ्या विचारसरणीला नक्कीच विरोध करतो. त्याच्यासाठी धर्मापेक्षा मानवता,



जात, धर्म, पंथ किंवा अंधश्रद्धेपेक्षा माणुसकी, विज्ञाननिष्ठा आणि संविधाननिष्ठेला प्राधान्य देणारा माणूस म्हणजे आंबेडकरी माणूस.

जातीपेक्षा माणूस आणि परंपरेपेक्षा सत्य अधिक महत्त्वाचे असते. समाज परिवर्तनासाठी मोठमोठ्या घोषणा करण्यापेक्षा प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात केली पाहिजे. आपल्या घरात समतेचे वातावरण निर्माण करणे, पालकांचा सन्मान करणे, स्त्रीचा आदर करणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, शिक्षणाला प्राधान्य देणे आणि गरजूंच्या मदतीला धावून जाणे, हीच खरी समाजसेवा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.' हा संघर्ष कोणाविरुद्ध नसून अज्ञान, अन्याय, अंधश्रद्धा आणि विषमतेविरुद्ध आहे. संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात रुजविणे हीच आंबेडकरी चळवळीची खरी दिशा आहे.


**विलास गजभिये**
मो. 9421588901

शेवटी, प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे, आपण समाजाला काय देतो? जिवंत माणसाच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, गरजवंताला आधार देणे, शेतकऱ्याचा सन्मान करणे, पर्यावरण जपणे, पालकांची सेवा करणे आणि प्रत्येक माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, हाच खरा धर्म आहे. समाजाला आज दगडांची पूजा करणाऱ्यांपेक्षा माणुसकीची पूजा करणाऱ्या माणसांची गरज आहे. जो माणूस संविधान, विवेक, समता आणि मानवतेवर विश्वास ठेवतो, तोच खऱ्या अर्थाने आंबेडकरी माणूस आहे.●●

# आश्वस्त



**शिल्पाला मॅनेजर जगन यांनी बोलावल्याने ती त्यांच्या केबिनमध्ये दाखल झाली. त्यांनी तिचे स्मित करून स्वागत केले, 'ये शिल्पा बस..'शिल्पा त्यांच्या समोरील खुर्चीवर बसली. तिच्या मनात धाकधुक सुरू होती की साहेबांनी अचानक का बोलवले असेल? नेमका तिला अंदाज लागत नव्हता. तिच्या डोक्यात विचारचक्र सुरू असतांनाच त्यांनी विचारले, 'सध्या काय सुरू आहे?' तिला त्यांच्या प्रश्नाचा रोख पुरेसा लक्षात आला नाही.**

त्यामुळे तिने विचारले, 'कशाबद्दल बोलता आहात सर?' ते हसले,' घाबरू नकोस. काही विशेष नाही. तुला एक गोष्ट विचारण्यासाठी बोलावले होते.'

'कोणती?' ती पटकन बोलून गेली. आता तिची अधीरता ताणली जात होती.

'काही नाही, तू आता स्वतःच्या मेहनतीवर शिकलीस. घराला हातभार लावलास. बऱ्या पैकी पगार मिळतो. वयही पंचवीस - सव्वीस आहे, तेंव्हा लग्नाचा विचार करतेस की नाही?' त्यांच्या या प्रश्नावर क्षणकाळ काय उत्तर द्यावे तिला सुचत नव्हते. थोडी सावरली आणि म्हणाली, 'सर आईबाबा प्रयत्न करीत आहेत. एक दोन स्थळ आली होती. गोष्ट पुढे काही गेली नाही.' तिने सत्य ते सांगितले.

'माझा सख्खा भाचा आहे रवि. आई आणि तो, वडील नाहीत. तुझी हरकत नसेल तर...' त्यांचे वाक्य मध्येच तोडत ती बोलून गेली, 'सर, मी तर एससी समाजाची आहे. मग..'

तिच्या मनात चाललेली घालमेल त्यांच्या लक्षात आली.

'मी जाणतो. पण, माझा जातीपातीवर विश्वास नाही. मी तुला सहासात वर्षापासून ओळखतो. तुझे काम आणि शिक्षणाप्रतीची ओढ माझ्या लक्षात आहे. माझा भाचा तुझ्यासारखाच मेहनती आणि सांभाळून घेणारा आहे. कॉम्प्युटरमध्ये पॉलिटेक्निक केल्यावर एका कंपनीत कामाला लागला. सात आठ वर्ष झालीत. बरा पगार मिळतो. काही खाजगी कामेही घेतो. त्याचेही त्याला पैसे मिळतात. आताच घर बांधले. धोरणी आणि विचारी आहे. तुझा स्वभाव पाहून माझ्या मनात ही कल्पना आली. तू विचार कर. दडपण ठेऊ नकोस की सरांनी विचारले तर कसे? याबाबत कुठलाही निर्णय झटपट घेऊ नये. तुला पटले तर आईबाबांशी मी बोलेन. धार्मिक विषयाचे दडपण घेऊ नकोस. तुझे धार्मिक स्वातंत्र्य कायम राहील याची मी खात्री देतो.' त्यांनी आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त केल्यात.

'सर, काही दिवस द्या विचार करायला.' तिने आपली भूमिका स्पष्ट केली. 'काही हरकत नाही. तुझी इच्छा असेल तर एक दोनदा गाठी भेटी घेऊन संवाद साधून बघ. तुला पटले तर पुढे जावू. तो माझ्या शब्दाबाहेर नाही.' त्यांनी तिच्यात विश्वास निर्माण होईल या शब्दात संवाद साधला. 'ठीक आहे सर..' एवढे बोलून ती केबिन बाहेर आली. तिला मागचा काळ आठवला. सुपर शॉपित मॅनेजर जगन यांनीच काम मिळण्यासाठी मदत केली होती. शिक्षण घेण्यासाठी कामात सवलत देऊ केली होती. दुपारच्या वेळेस ग्राहकांची वर्दळ नसतांना सोबतच्या महिलांना सांभाळून घेण्याची सूचना केल्याने तिथेच ती वेळ असला की अभ्यास करायची. त्यामुळे पदवी शिक्षण शक्य झाले. जगन सर तिच्या घरीपण येऊन गेले होते. तिच्या आईवडिलांशी चांगला संवाद होता. घरच्यांबाबत विचारपूस करीत राहायचे. तिच्या मनात त्यांच्याप्रती कृतज्ञता भाव होता. पण हा विषय जरा वेगळा होता. त्यामुळे तिच्या मनात संभ्रम होता. जगन सर माझे अहित करणार नाहीत याबाबत मात्र तिला विश्वास होता. आठ दहा दिवसात विचार पक्का करून शिल्पाने त्यांना रविशी भेटीची इच्छा व्यक्त केली. जगन सरांनी सर्व जुळवून आणले. दोघांची भेट झाली. पाहता क्षणीच दोघांनाही एकदुसऱ्याच्या अनुरूप असल्याचा भास झाला. कॅफे हाऊसमध्ये संवाद साधला. 'कमवा आणि शिका' या तत्वावर दोघांचीही वाटचाल असल्याने एकमेकांप्रती आदर वाटला. सूर जुळत असल्याचे तिला जाणवू लागले. रवि फारसा बोलका नव्हता. पण काही बाबतीत त्याची मत ठाम असल्याचे तिला बोलण्यातून जाणवले. त्याच्या बोलण्यातून तो खूप धार्मिक वैगेरे आहे असे अजिबात तिला वाटले नाही. आई बाबत मात्र थोडा हळवा आहे हे तिला जाणवले. भेट छान झाली होती.पुढच्या भेटीची तारीख ठरवून त्यांनी निरोप घेतला. दोन तीन गाठीभेटी नंतर दोघांच्याही डोळ्यात सकारात्मकतेचे भाव जाणवू लागले होते. भेटीची ओढ वाढत असल्याचे शिल्पा आणि रविच्या लक्षात आले. एक दिवस शिल्पाने जगनरावांना आई बाबांशी बोलण्यास सांगितले. तशी तिनेही त्यांना कल्पना दिली होती. पण जगनरावांनी पुढाकार घेतला तर अधिक उत्तम असे तिला वाटले. जगनरावांनी तिच्या आईवडिलांशी संवाद साधला आणि त्यांनी सहमती दर्शविताच पुढल्या तयारीला लागले. त्यांनी फारसा खर्च होणार नाही आणि कुणाला धर्म, जातीपातीची चर्चा करायला जागा राहणार नाही असा पर्याय म्हणजे कोर्ट मॅरेजसाठी दोन्ही कुटुंबांना राजी केले. पुढाकार घेऊन सर्व धावपळ केली. कोर्ट मॅरेजनंतर छोटे खानी मोजक्या लोकांच्या उपस्थितीत स्वागत समारंभ आयोजित केला. उभयतांना शुभेच्छा देण्यासाठी जगनराव स्टेजवर गेलेत तेंव्हा शिल्पाच्या चेहऱ्यावर हलके स्मित होते. स्मित, ती मनातून आनंदी असल्याची ग्वाही देत होते. ती त्यांना अभिवादनासाठी खाली वाकली तेंव्हा त्यांनी तिला पाठीवर हलके थोपटून आशीर्वाद दिला. शिल्पाला त्या हातांचा स्पर्श 'घाबरू नकोस' प्रत्येक क्षणी तुझ्या पाठीशी असल्याबाबत आश्वस्त करीत असल्याचे जाणवला.●●


**अनिरुद्ध कांबळे**
मो.9922959770

# रूपगर्विता विमला म्हणे बंधमुक्त मी

बुद्धकालीन वेसाली नगरीत एक लावण्यवती, सौंदर्यवती गणिका होती. जीवनयापन करण्याचे हेच तिचे एकमेव साधन होती. तिच्या पोटी जन्माला आलेल्या मुलीनेही तोच मार्ग अनुसरला. गणिकेच्या पोटी जन्माला आलेल्या मुलीचे भविष्य दुसरे काय असणार? आईसारखी गणिकावृत्ती स्वीकारून जगण्याशिवाय दुसरा पर्याय काय असणार? विमलाला वारसाने तिच्या आईचे रूप लाभले होते. ती वयात आली. तारुण्य बहरले. आईने तिला व्यवसाय पाठ दिला. विमला व्यवसाय कला शिकली. पाहता पाहता ती एक चतुर गणिका बनली. विमला म्हणायची -

'अंगावरचा आभूषणाचा
झगमगाट दिपवी डोळे
क्षणात मोहवी जनमानसास
मम देह सौंदर्यामुळे
माया मी मोहजाल मी
अपमानित होणे अपरिहार्य असे
माझ्या दर्पोक्त वचनामुळे ।।'

**विमला निग्रहाने वेश्यावृत्तीपासून हळूहळू दूर झाली. तिने बौद्ध उपासना नित्यनेमाने अंगीकारली. ध्यान शिकली. स्वतःला कठोर कसोटीवर घासून सिद्ध केले आणि एका मंगलदिनी 'बुद्धं सरणं गच्छामि'च्या पवित्र जयघोषात बौद्ध भिक्खुणी बनली...**



पुरुषांना आकृष्ट करण्याची कला विमलाकडे होती. तारुण्याचे सगळे नखरे तिला अवगत होते. सौंदर्य, तारुण्य आणि पैसा याशिवाय माणसाला आणखी काय हवे? असे तिला वाटे. ती सुंदर केशरचना करायची. सोन्याच्या अलंकारांनी शरीर सजवायची आणि वेश्यागृहाच्या दाराशी सावधपणे बसायची. येणाऱ्या-जाणाऱ्या पुरुषांना खुणवायची. त्यांना आपल्या जाळ्यात अडकवायची. सावज पकडण्यात ती तरबेज झाली. एके दिवशी तिने एका वेगळ्या पुरुषाला पाहिले. त्याच्या अंगावर भगवी वस्त्रे होती. तो बौद्ध भिक्खू होता. त्याची नजर स्वच्छ होती. सहज होती. अगदी लहान मुलासारखी. तो वेश्यागृहाच्या दारासमोरून हळुवारपणे चालला होता. पण त्याला ते जाणवलेसुद्धा नाही. तो प्रसन्न, शांत चित्ताने पुढे पुढे जात होता. यापूर्वी असा पुरुष विमलासमोरून कधी गेला नव्हता. कुणी थोडे घाबरलेले असायचे, कुणी थोडे चपापलेले असायचे. कुणाची नजर चोरटी असायची. तर कोणाची लोभस. कुणी हिशेबाने जोखत तिच्यासमोरून जात. पण हा पुरुष निरिच्छ नजरेने, मनाने विमलासमोरून निघून गेला. विमला अस्वस्थ झाली. माझ्या सौंदर्याचा, माझ्या वृत्तीचा अवमान तिला वाटला, त्याने केलेल्या दुर्लक्षामुळे उलट ती त्याच्याकडे आकृष्ट झाली आणि ती त्याच्या मागे मागे चालू लागली... तो बौद्ध भिक्खू म्हणजे स्थवीर 'महामौद्गल्यायन' होते. विमला त्यांचा पाठलाग करीत करीत थेट त्यांच्या कुटीपर्यंत पोहोचली. भिक्खूने तिला आपल्या येथे आलेली पाहिले. तो चकित झाला. स्वतःला सावरून त्यांनी तिला येण्याचे कारण विचारले. विमला थक्क झाली. तिच्यासारख्या गणिकेजवळ एखाद्या पुरुषासाठी काय मागणे असू शकेल? याची कल्पना नसलेला पुरुष तिला आयुष्यात प्रथमच भेटला होता. पण हाच पुरुष तिला आज हवासा वाटला. तिची वृत्ती याबाबत संस्कारित नसणारच मुळी. तिच्यासाठी हा विषय लज्जेचा, संकोचाचा नव्हताच. तो तिच्या रोजच्या जगण्याचे वास्तव आणि उघड भाग होता. म्हणून तिने तिची अस्त्र वापरून पाहिली. त्याच्याकडे सहवासाची याचना केली. पूज्य भिक्खू महामौद्गल्यायन अवाक झाले. मात्र त्यांनी वस्तुस्थिती लक्षात घेतली. तिला पळवून न देता तिची कठोर शब्दात कानउघाडणी केली. आयुष्य, आयुष्याची निरर्थकता, आयुष्याविषयीची घृणा त्यांनी तिला समजावली. तथागत बुद्धांच्या रसाळ धम्मवाणीचा वर्षाव केला. भिक्खू मौद्गल्यायन विमलाला म्हणाले, 'आजचे तारुण्य उद्या ढळणारच, आजचे सौंदर्य उद्या असेच राहाणार नाही.' त्याची निरर्थकता त्यांनी विमलाला पटवून दिली. देह ही बाब गौण असू शकते, याची विमलाने आतापर्यंत कल्पनाही केली नव्हती. भिक्खू महामौद्गल्यायन यांनी तिला देहापेक्षाही महत्त्वाच्या गोष्टी समजावून सांगितल्या. हा व्यवसाय अभिमानास्पद नाही हेही पटवून दिले.


**मिलिंद मानकर**
मो. 8177866397

आयुष्यात पहिल्यांदाच एका पुरुषाने तिच्या मोहात न पडता तिला कल्याणाच्या गोष्टी सांगितल्या. विमला निर्बुद्ध मुळीच नव्हती. त्या भिक्खूची वाणी तिने मनापासून ऐकली. ती भारावून गेली आणि सद्गदित झाली. विमलाने भिक्खूच्या पावन चरणावर अनन्यभावे नतमस्तक होत अश्रूंना मोकळी वाट करून दिली. विचारचक्र फिरले. ती आपल्या गत आयुष्याकडे स्वच्छपणे पाहू लागली. तिला स्वतःची लाज वाटू लागली. छे, आपण कसे जगत होतो? तिच्या मनात संघर्ष सुरू झाला. आजपर्यंत आपण इतरांना पतित करण्यासाठी कोणकोणते खेळ खेळलो? तिला पश्चात्ताप झाला. आपल्या पूर्वायुष्यापासून दूर जायचे असा तिने निर्धार केला. हे काम म्हणावे तितके सोपे नव्हते. मात्र तिने 'उपासिका' म्हणजे गृहस्थी शिष्या बनून रोजच्या आयुष्यातच ते साध्य केले. निग्रहाने ती वेश्यावृत्तीपासून हळूहळू दूर झाली. तिने बौद्ध उपासना अंगीकारली. कुशल कर्माचे आचरण करू लागली. ध्यान शिकली. स्वतःला कठोर कसोटीवर घासून सिद्ध केले आणि एका मंगलदिनी 'बुद्धं सरणं गच्छामि'च्या पवित्र जयघोषात ती बौद्ध भिक्खुणी बनली. तिच्या मुखमंडलातून शब्द बाहेर पडले -

डोईचे मुंडन करूनी
अंगावरती काषाय वस्त्रे
भिक्षा हेच जीवन आता
निवास विजन वनातील वृक्षलता
हाच विसावा माझा
लोभ, मोह, आकांक्षा
यांचा मज गंध नसे
मुक्त मी मुक्त आता...

एकेकाळी सुंदर सुंदर अलंकारांनी नटलेल्या, पुरुषांना आकर्षित करण्यासाठी नाना उपाय करणाऱ्या विमलाची तुलना तिने नंतरच्या मुंडन केलेल्या भगव्या वस्त्रातील विमलाशी केली. ती म्हणाली, 'मी सर्व पापांना दूर फेकून निर्वाणाला प्राप्त केले आहे. मी आता परम शांत झाले आहे.'

बंधमुक्त मी झाले
ना दैवी ना मानवी
दूषित मनातील कलंक पुसला
शांत मुक्त मी स्वतंत्र झाले... स्वतंत्र झाले...
साधु! साधु!! साधु!!!

महाप्रजापती गोतमी, यशोधरा, आम्रपाली, विशाखा, सुजाता, क्षेमा, पटाचरा, ऋषीदासी, भद्रा कुंडलकेशा, वनचरी चापा किंवा विमला अशा साऱ्या 72 बौद्ध उपासिकांचे जीवन आणि कार्य 'थेरीगाथा' या बौद्ध ग्रंथात अगदी सहज सोप्या भाषेत अंकुरित आहे. प्रामाणिक आहे. आकाशातील सूर्याच्या प्रकाशाप्रमाणे स्वच्छ आणि बोधगयेच्या निरांजना नदीप्रमाणे निर्मळ आहे म्हणूनच 2500 वर्षांपूर्वीच्या त्या गाथा आजही वाचनीय आणि दीपस्तंभासारख्या मार्गदर्शक आहेत.●●

# घडलेल्या गोड गुन्ह्याची कबुली !

**महाविद्यालयीन जीवनातील काही गोष्टी किंवा खोडी कायमच मनात घर करून राहतात नव्हे वेळोवेळी त्या आठवल्या की आपण किती खोडकर होतो असे म्हणत स्वतःच गुलाबी वातावरणात रमुन जातो. किंवा आता कोण विचारतो म्हणून मित्रांमध्ये त्या घटनेची कबुलीही देऊन टाकतो. म्हटले तरी प्रत्येकाच्या जीवनात अशा काही गोष्टी घडून गेलेल्या असतात त्या कुणी अनेक वर्ष आपल्या नि मित्रांच्या मनाच्या कोपऱ्यात दडलेल्या असतात.**

40 ते 45 वर्षापूर्वी सटाणा महाविद्यालयात शिकवणाऱ्या तत्कालीन आमच्या प्राध्यापिका शकुंतला पुरकर मॅडमचा फोन आला आणि त्यांनी सपत्नीक घरी या, गप्पा मारू आणि जेवायला जाऊ म्हटले. साहजिकच मॅडमकडून घराचा पत्ता घेतला आणि पत्नीसह त्यांच्या हनुमान वाडीतल्या घरी पोहोचलो. मॅडमकडे कॉफी घेतली आणि सौं ना त्यांचेकडे सोडून शेजारी गल्लीत राहणाऱ्या सेवानिवृत्त प्राचार्य के. एम. पवार यांचेकडे पोहोचलो नाहीतरी त्यांच्या गुडघ्याचे ऑपरेशन झाल्याने बघायला जायचेच होते. सरांना सर्व महाविद्यालय बापू म्हणतं. के. एम. बापूंकडे पोहोचताच तब्येतीची चौकशी झाली आणि त्यांनी सौं ना घेऊन ये म्हणून आदेश दिला. गुरूंची ऑर्डर शिरसावन्द्य मानून मिसेसला त्यांचेकडे घेऊन आलो. पुन्हा महाविद्यालयीन काळातल्या आठवणींना उजाळा देण्यात आला. आई वडील कसे नि मुले काय करतात, इथवर चौकशी झाली. त्यानंतर महाविद्यालयीन काळातील गुन्ह्यांची कबुली देऊन टाकली. सरही मनसोक्त हसले. महाविद्यालयीन काळात राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रम संस्कार शिबीरे होते. त्यात श्रमदानाबरोबरच विविध सांस्कृतिक कार्यक्रम व्हायचे. माझ्या कवितानाही तसे हक्काचे व्यासपीठ मिळायचे. सटाणा तालुक्यातील ब्राह्मणगाव येथील मविप्र संस्थेच्या जनता विद्यालयाच्या आवारात आमचा तंबू होता. सर्व गाणी, गोष्टी, मनोरंजनाचे कार्यक्रमही तसे आटोपले होते. थकलेले शिबिरार्थी त्या दिवशी तसे लवकर झोपले. शिबिरार्थी आम्ही मित्र अनिल. सोनवणे, प्रकाश देवरे आणि रमेश हयाळीज असे हळूच उठलो. मागच्या दाराने तब्बल 10 किमी अंतर कापत सटाणा येथे चित्रा चित्रपटगृहात पोहोचलो. त्यावेळचा सुपरस्टार राजेश खन्नाचा दो रास्ते चित्रपट लागलेला होता. घाबरतच तिकिटे काढली आणि एकेक करीत चित्रपट गृहाच्या अंधारात गडप झालो. चित्रपट सुटल्यावर पुन्हा पायपीट करीत रात्रीच एक दीडला श्रम शिबिराच्या तंबुत गायब झालो सकाळी पुन्हा जैसे थे. त्याच महाविद्यालयात अनिल नि माझे वडील नोकरीला असल्याने आमचे बिंग फुटेल या भीतीने कसे बसे शिबीर पार पडले. परंतु त्यांनाही कळू दिले नाही. वा चित्रपट गृहात कुणी ओळखीचा मिळाला नाही नि घरापर्यंत आमचे गुपित फुटले नाही. कुणाच्या कानाला आजपर्यंत हा दो रास्ते चा किस्सा कळू दिला नाही. मात्र आज के. एम. बापूना सांगितले की तुमच्या कस्टडीतून कसे पसार झालो त्यावेळी बापू हसत राहिले. तोपर्यंत सेवानिवृत्त प्रा. पूरकर मॅडम चार चाकी घेऊन हजरच होत्या. आम्हीही दुचाकीवर स्वार होत हॉटेल गाठले. भोजन करून निरोप घेताना मात्र बापुना जुन्या मजेशीर गुन्ह्याची कबुली दिल्याची भावना जी मनात घर करून होती ती प्रांजळपणे बापूंसमोर कबूल केल्याचे समाधान अजूनही वाटतेय.●●


**शफीक शेख**
मो. 9420588366



# रूढीवादी जीर्ण व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा कवी दिगंबर झाडे यांचा काव्यसंग्रह

त्यांच्या प्रेरणेने आंबेडकरी साहित्य चळवळीचा जन्म झाला. शाहिर, गीतकार, नाटककार, कवी आणि साहित्यिकांनी दलित साहित्याची समृद्ध परंपरा घडवून ती पुढे आंबेडकरी साहित्य म्हणून जागतिक स्तरावर नेली. नव्वदीनंतर उदयास आलेल्या या दुसऱ्या पिढीतील महत्त्वाचे साहित्यिक म्हणजे ज्येष्ठ कवी व चित्रकार दिगंबर झाडे. सन २००४ मध्ये प्रकाशित झालेला त्यांचा 'वज्रनाद' हा कवितासंग्रह अभ्यासपूर्ण, चिंतनशील आणि परिवर्तनवादी काव्यदृष्टीचा उत्कृष्ट आविष्कार आहे. या संग्रहाचे स्वागत प्रख्यात साहित्यिक बाबुराव बागुल, नारायण सुर्वे, डॉ. अशोक पळवेकर आदींनी केले. या संग्रहाला दहा पुरस्कार मिळाले असून त्याच्या साहित्यिक गुणवत्तेची ती साक्ष आहे. या संग्रहाचा हिंदी अनुवाद ज्येष्ठ साहित्यिक डॉ. युवराज सोनटक्के (बेंगळुरू) यांनी केला. त्यामुळे 'वज्रनाद'ला राष्ट्रीय पातळीवर नवे वाचक लाभले आणि हिंदी साहित्यविश्वातही त्याचे कौतुक झाले. आंबेडकरी चळवळीत कार्यरत असताना कवी दिगंबर झाडे यांच्याशी जवळून परिचय होण्याची संधी मला मिळाली. 'संबोधि' डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडी सर्कल व संस्कार भवनचे संस्थापक अध्यक्ष, स्मृतीशेष सुखदेवराव पाटील यांच्या सहवासात कार्य करताना झाडे यांची निष्ठा, माणुसकी आणि चळवळीशी असलेली बांधिलकी अनुभवता आली. त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल तेव्हाच मनापासून अभिनंदन केले होते. आता 'वज्रनाद'च्या हिंदी आवृत्तीच्या निमित्ताने त्यावर लिहिण्याची संधी मिळाल्याचा आनंद आहे. 'वज्रनाद'मधील कविता आंबेडकरी चळवळीचे वास्तव, सामाजिक विद्रूपता, अंतर्विरोध आणि परिवर्तनाची गरज प्रभावीपणे मांडतात. कवी समाजव्यवस्थेचे सूक्ष्म विश्लेषण करून अन्याय, पराधीनता आणि सामाजिक निष्क्रियतेवर प्रखर भाष्य करतात. त्यांच्या कवितेला विद्रोहाची धार असली तरी ती संयमित आणि विधायक आहे. अनुभवविश्वाची व्यापकता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनाची आस या त्यांच्या कवितेच्या ठळक वैशिष्ट्ये आहेत. 'अर्हता' या कवितेत ते म्हणतात, 'हातावरच्या रेषा हृदयाशी धरून नशीब कवटाळणारा मी नव्हे, गाव पेटल्यावर आभाळाकडे टक लावून बघणारा मी नव्हे.' या ओळींमधून कवी दैववादाला नाकारून विज्ञाननिष्ठ, तर्कशुद्ध आणि कृतीशील जीवनमूल्यांचा पुरस्कार करतात. रूढीवादी विचारांची जळमटे झुगारून समाजाला जागृत करण्याचा संदेश ते देतात. 'अधिष्ठान' या कवितेत व्यवस्थेवर प्रहार करताना ते लिहितात, 'आपणच आपली रचावी चिता, अशाच आपल्या भाकड कथा, कोणत्या गर्वाने फुलते तुमची छाती, भगवा काळोख आणि भगवीच माती.' या ओळी समाजातील दांभिकता, अंधश्रद्धा आणि सत्ताधारी मानसिकतेवर तीक्ष्ण प्रहार करतात. सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करताना ते म्हणतात, 'असा घडत गेलो, जिरत गेलो, सरत गेलो, भुईतल्या घामासारखा थेंब थेंब मुरत गेलो.' या ओळींमध्ये श्रमिक, वंचित आणि संघर्षशील जीवनाचे विदारक वास्तव प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. तर मानवी वेदनांचा आविष्कार पुढील ओळींतून होतो, 'अनंत वेदनांचा महापूर उफाळून येतो अंगभर, काळजात घडणारे भूकंप आता सहन होत नाही.' भ्रष्ट व्यवस्था, बेरोजगारी, असुरक्षितता आणि तरुण पिढीच्या नैराश्यावर कवीने येथे विद्रोही स्वरात भाष्य केले आहे. निसर्ग आणि आशावाद यांचाही सुंदर संगम त्यांच्या कवितेत दिसतो, 'मी सुखावत जातो निसर्गाच्या सान्निध्यात, समुद्रावर अंथरलेला सूर्यप्रकाश उराच्या अंतिम टप्प्यात उजागर होताना.' तसेच आशेचा संदेश देताना ते लिहितात, 'कुठलाच अंधार शाश्वत नाही, काळोख तेवढा खोदून काढा, तळाशी सूर्यकिरणांनी भिजलेली चिंब ओली पहाट फुटेल.' या ओळी कवीचा सकारात्मक, परिवर्तनवादी आणि मानवतावादी दृष्टिकोन अधोरेखित करतात. या संग्रहात एकूण साठ कविता असून प्रत्येक कविता स्वतंत्र सामाजिक आशय घेऊन उभी राहते. आंबेडकरी चळवळ, मानवी मूल्ये, विद्रोह, करुणा, संघर्ष आणि परिवर्तन यांचा प्रभावी आविष्कार या कवितांत दिसतो. संग्रहाला डॉ. युवराज सोनटक्के यांची प्रस्तावना लाभली असून डॉ. अशोक नामदेवराव पळवेकर, डॉ. जावेद पाशा, बाबुराव बागुल आणि नारायण सुर्वे यांसारख्या मान्यवर साहित्यिकांनी त्याचे कौतुक केले आहे. कवी दिगंबर झाडे यांनी स्वतःच मुखपृष्ठ व रेखाचित्रे साकारल्यामुळे संग्रह अधिक आकर्षक झाला आहे. गाथा प्रकाशनेही त्याचे दर्जेदार प्रकाशन केले आहे. 'वज्रनाद' हा केवळ कवितासंग्रह नाही; तो सामाजिक परिवर्तनाचा घोष, विवेकाचा आवाज आणि आंबेडकरी विचारांचा सशक्त दस्तऐवज आहे. कवी दिगंबर झाडे यांच्या कविता शब्दांच्या पलीकडे जाऊन सामाजिक जबाबदारीची जाणीव जागवतात. म्हणूनच हा संग्रह प्रत्येक साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि आंबेडकरी विचारांच्या वाचकांनी अवश्य वाचावा व संग्रहित करावा.●●

**विषम, विषाक्त आणि अमानवी समाजव्यवस्थेने माणसामाणसांत भेदाभेद निर्माण करून सामान्यांच्या जीवनात अन्याय, अत्याचार आणि असमानतेचे प्रश्न उभे केले. अशा काळात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही जीवनमूल्ये समाजाला दिली.**


**रतन तायडे**
94201 25761




## 'वज्रनाद'

कविता संग्रहाचे नाव : वज्रनाद(हिंदी)
कवी : दिगंबर झाडे
हिंदी अनुवादक : डॉ. युवराज सोनटक्के (बेंगळुरू)
प्रकाशन : गाथा प्रकाशन, अमरावती
पृष्ठे : १००
किंमत : २२०/-

## महत्वाचे

### नागपूर महापालिकेत अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**नागपूर :** लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या स्मृतिदिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. विपिन इटनकर यांनी डॉ. साठे यांच्या साहित्य, लोककला व सामाजिक कार्याचा गौरव केला. यावेळी दुर्बल घटक समितीच्या अध्यक्षा कु. लक्ष्मीताई हत्तीठेले यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

### 'वेळ बांधलेला पहारा'ला सतेश्वर मोरे प्रतिभा सन्मान पुरस्कार

**नागपूर, प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य व संस्कृती संवर्धन महामंडळातर्फे प्रदान करण्यात येणारा २०२६ चा 'सतेश्वर मोरे प्रतिभा सन्मान पुरस्कार' साहित्यिक संजय डोंगरे यांच्या 'वेळ बांधलेला पहारा' या कविता संग्रहाला जाहीर झाला आहे. संजय डोंगरे यांचा पहिला कविता संग्रह 'त्यांची हीच ती वेळ आहे' हा सन २००० मध्ये प्रकाशित झाला होता. त्यानंतर २०२६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'वेळ बांधलेला पहारा' या कविता संग्रहाला हा मानाचा पुरस्कार मिळाल्याने साहित्य क्षेत्रात आनंद व्यक्त केला जात आहे. कवितेबरोबरच त्यांचे दोन कथासंग्रह, एक ऐतिहासिक ग्रंथ, बालकवितांचा संग्रह, किशोर कादंबरी आदी साहित्य प्रकाशित झाले आहे. तसेच ते बहुचर्चित 'अरिय' या वार्षिकाचे संपादक आहेत. यापूर्वी त्यांना अस्मितादर्श पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. या यशाबद्दल सम्मर्षण ग्रुप (लोकोत्तम साहित्य-कला-सांस्कृतिक मंच) यांनी संजय डोंगरे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### नीट परीक्षेत सुजात शिरसाटचे उल्लेखनीय यश



**नागपूर :** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET) मध्ये ५५२ गुण मिळवत सुजात अजय शिरसाट याने एमबीबीएस प्रवेशासाठी पात्रता मिळविली आहे. सुजात हा सामाजिक कार्यकर्ते एकनाथराव शिरसाट यांचा नातू तसेच ग्रंथालय अधिकारी अजय शिरसाट व रंजना शिरसाट यांचा चिरंजीव आहे. न्यू महसूल कॉलनीतील रहिवासी असलेल्या सुजातने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल परिसरात आनंद व्यक्त होत असून विविध स्तरांतून त्याचे व त्याच्या कुटुंबीयांचे अभिनंदन करण्यात येत आहे. यापूर्वी मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालयातर्फे आयोजित गुणवान विद्यार्थी सत्कार समारंभातही सुजातचा मान्यवरांच्या हस्ते गौरव केला होता. भविष्यात उत्कृष्ट डॉक्टर बनून समाजसेवा करावी, अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

### मनपाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना रेनकोट व छत्रीचे मोफत वितरण



**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधील दहावीच्या वर्गातील 1100 विद्यार्थ्यांना अमृतछाया अभियानाअंतर्गत रेनकोट व छत्रीचे वितरण महापौर निता ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे व शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लद्धा यांच्या हस्ते करण्यात आले.
नागपूर महानगरपालिका व रोटरी क्लब ईशान्यच्या संयुक्त विद्यमाने हा अमृतछाया अभियान कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित केला होता. यावेळी उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, नेहरुनगर झोन सभापती ज्योती देवघरे, उपसभापती भारती बुंदे, नगरसेविका वैशाली उदापूकर, नगरसेविका वर्षा डोंगरे, सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, शिक्षणाधिकारी वंदना महाजन, रोटरी क्लबचे निलेश राठी, धीरज साबू उपस्थित होते.

## निधन वार्ता

### प्रमिला वामनराव काळबांडे



**नागपूर :** सावरगाव येथील आदर्श शिक्षिका व माजी जिल्हा परिषद सदस्या प्रमिलाबाई वामनराव काळबांडे यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी, १७ जुलै रोजी, नागपूरला निधन झाले. त या ज ये ष्ठ संपादक प्रमोद काळबांडे तसेच शिक्षक प्रशांत काळबांडे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर शुक्रवारी सावरगाव मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार पार पडले .

# बाबुराव बागुल : दलित साहित्याचे युगप्रवर्तक, भारतीय साहित्यातील हिमालय : डॉ. प्रा. रावसाहेब कसबे



**नाशिक (संवाद मित्र प्रवीण शांताराम) :** स्मृतीशेष बाबुराव बागुल यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त नाशिकमध्ये बाबुराव बागुल प्रतिष्ठान, आंबेडकरी-डाव्या पुरोगामी संघटना आणि ॲडव्होकेट फॉर सोशल जस्टिस यांच्या संयुक्त विद्यमाने परशुराम सायखेडकर नाट्यगृहात हा कार्यक्रम आयोजित केला होता. दलित पॅन्थरचे संस्थापक सदस्य अर्जुन डांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. 'आपले आबा' या विषयावर परिसंवाद, स्मरणसभा आणि साहित्यिक चर्चा झाली. डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. इंदिरा आठवले, प्रा. गंगाधर अहिरे, शाहीर चरण जाधव यांचेसोबत प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांची पुण्याहून ऑनलाईन सहभाग आदी मान्यवर उपस्थित होते.

**बाबुराव बागुल : जीवन आणि योगदान**

बाबुराव रामजी बागुल (१७ जुलै १९३० - २६ मार्च २००८) हे मराठी साहित्यात दलित साहित्य चळवळीचे प्रमुख प्रवर्तक होते. नाशिकचे मूळचे बागुल यांनी मुंबईतील माटुंगा लेबर कॅम्पमध्ये वाढत्या काळात आंबेडकरवाद, मार्क्सवाद आणि अण्णा भाऊ साठे यांच्या प्रभावाने विद्रोही साहित्य निर्मिले. त्यांचे लेखन शोषित, दलित आणि कष्टकरी वर्गाच्या वास्तववादी, कठोर जीवनानुभवावर आधारित आहे.

**त्यांचे प्रमुख साहित्य :** बागुल यांनी कथा, कादंबरी, कविता आणि समीक्षा अशा विविध प्रकारांत लेखन केले. त्यांच्या प्रमुख साहित्यकृती खालीलप्रमाणे :

**कथासंग्रह :** जेव्हा मी जात चोरली होती (१९६३), मरण स्वस्त होत आहे (१९६९)

**कादंबऱ्या :** सूड (१९७०), अघोरी (१९८३), कोंडी (२००२), पावशा, भूमिहीन, मूकनायक, सरदार, अपूर्वा.

**कविता :** आकार (१९६७), वेदाआधी तू होतास

**वैचारिक :** आंबेडकर भारत (१९८१), **दलित साहित्य :** आजचे क्रांतिविज्ञान

त्यांचे साहित्य वास्तववादी, विद्रोही आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीला प्रेरणा देणारे आहे. नामदेव ढसाळ यांनी त्यांना "मराठीतला दोस्तोव्हस्की" म्हटले होते.

'जेव्हा मी जात चोरली होती' कथेचे विश्लेषण, ही कथा बागुलांच्या स्वानुभवावर आधारित आहे. नायक सूरत येथे रेल्वे नोकरीसाठी जातो आणि घर मिळवण्यासाठी आपली दलित जात लपवतो. सुरुवातीला उच्चवर्णीय रामचरणशी मैत्री होते, पण जात उघड होताच तो मारहाणीचा बळी ठरतो. कथेच्या शेवटी नायक म्हणतो, "मला मारले नाही, मनूने मारले."

जातीय छळ आणि ओळख लपवण्याची वेदना

**मैत्रीचा विश्वासघात :** मनुस्मृतीसारख्या धार्मिक ग्रंथांचा जातीय हिंसेवर प्रभाव.

**दलित प्रतिकाराची गरज :** ही कथा केवळ व्यक्तिगत कहाणी नाही, तर संपूर्ण दलित समाजाच्या व्यथा आणि विद्रोहाचे प्रतिनिधित्व करते. १९६३ मध्ये प्रकाशित झालेली ही कथा दलित साहित्याचा 'महाकाव्य' मानली जाते.

**वारसा आणि प्रासंगिकता :** बागुल यांचे साहित्य आजही ज्वलंत आहे. ते केवळ साहित्यिक मूल्य नसून, सामाजिक परिवर्तनाचे हत्यार आहे. नाशिकमधील जयंती सोहळ्यात नागराज मंजुळे यांनी सांगितल्याप्रमाणे, आबा यांच्या विचारांचा प्रसार आजही आवश्यक आहे. त्यांच्या साहित्यातून दलित, शोषित आणि स्त्री-जीवनातील दुहेरी शोषणाचे चित्रण मिळते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शोभा बाबुराव बागुल, विनय बाबुराव बागुल, अनंत राऊत, सुबोध मोरे, डॉ. प्रवीण गांगुर्डे, ॲड. संगीता गायकवाड, ॲड. अरुण दोंदे, ॲड. भारत बुकाने, ॲड. अनिता जगताप, विजय अहिरे, तन्मय दोंदे, अरुण घोडेराव, ॲड. बाबासाहेब नन्नावरे आदींनी प्रयत्न केले

बाबुराव बागुल यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त नाशिकमध्ये झालेला कार्यक्रम हा केवळ स्मरण नव्हे, तर त्यांच्या विचारांना पुढे नेण्याची प्रतिज्ञा आहे. "वेदाआधी तू होतास..." अशा ओळींनी त्यांनी मानवी स्वातंत्र्य आणि समतेचा संदेश दिला. त्यांचा वारसा पुढील पिढीला प्रेरणा देत राहील.

# टेकऑफ सिटी येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची शाखा स्थापन



**नागपूर :** उमरेड रोडवरील बहादुरा येथील टेकऑफ सिटी टाउनशिपमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नव्या शाखेची स्थापना उत्साहात करण्यात आली. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विचार आणि अंधश्रद्धाविरोधी जनजागृती करण्याच्या उद्देशाने या शाखेची स्थापना करण्यात आली.
नवीन शाखेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्षपदी महेंद्र तिरपुडे, उपाध्यक्षपदी अविनाश गोसावी, कार्याध्यक्षपदी ज्योत्स्ना बनसोड, सचिवपदी नीलिमा बाराहाते, बुवाबाजी संपर्क विभाग प्रमुख रूपाली जाधव, वार्तापत्र व प्रकाशन विभाग प्रमुख शालिनी मेश्राम, मानसिक आरोग्य विभाग प्रमुख विनोद बाराहाते, महिला सहभाग विभाग प्रमुख वृंदा खंडारे, युवा व विवेक वाहिनी प्रमुख पूजा नंदागवळी, प्रशिक्षण विभाग प्रमुख संध्या घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख कुंदा पाटील, सोशल मीडिया व प्रसिद्धी विभाग प्रमुख मंगला लाडे, जातीअंत विभाग प्रमुख विजया सोमकुवर, विविध उपक्रम विभाग प्रमुख शर्मिला मेश्राम, वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प प्रमुख प्रीती तिरपुडे आणि कायदा विभाग प्रमुख योगेश्वरी निकोसे यांची निवड करण्यात आली. शाखा स्थापनेच्या कार्यक्रमाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नागपूर जिल्हाध्यक्ष संध्या राजूरकर, कार्याध्यक्ष डॉ. सुनिल भगत, राज्य समन्वयक रामभाऊ डोंगरे, राज्य महिला सहकार्यवाह देवयानी भगत तसेच शीला डोंगरे, मंगला गाणार, शोभा पाटील, मेश्राम आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अंधश्रद्धा, बुवाबाजी, बनावट चमत्कार आणि सामाजिक अनिष्ट प्रथांविरुद्ध वैज्ञानिक विचारांचा प्रसार करण्यासाठी संघटितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. नव्याने स्थापन झालेली शाखा परिसरात जनजागृती, प्रशिक्षण, वैज्ञानिक जाणीवा, महिला व युवक सहभाग तसेच सामाजिक प्रबोधनाचे विविध उपक्रम राबविणार असल्याची माहिती यावेळी दिली. कायदा विभाग प्रमुख योगेश्वरी निकोशे यांची निवड करण्यात आली.

# शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणांची मागणी

### समता सैनिक दलाचे राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांना निवेदन




**नागपूर :** राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमधील वारंवार होणाऱ्या प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांवर कायमस्वरूपी आळा घालणे, शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करणे, विद्यार्थ्यांचे हित सुरक्षित ठेवणे तसेच आंदोलनकर्ते सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्याची मागणी करत समता सैनिक दलाच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी नागपूर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती व प्रधानमंत्री यांच्या नावे निवेदन सादर केले.
निवेदनात म्हटले आहे की, प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असून परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी नैराश्यातून टोकाची पावले उचलल्याच्या घटना अत्यंत गंभीर असून शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे.
समता सैनिक दलाने परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम व विश्वासार्ह करण्याची, प्रश्नपत्रिका फुटीविरोधात कठोर कायदा करण्याची, शिक्षणाच्या व्यापारीकरणावर व अनियंत्रित खासगीकरणावर नियंत्रण आणण्याची तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधीसह दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. शिक्षण पूर्ण केलेल्या युवकांसाठी रोजगारनिर्मितीचे ठोस व कालबद्ध धोरण राबविणे, तसेच परीक्षा प्रक्रियेत भ्रष्टाचार अथवा निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचीही मागणी निवेदनातून करण्यात आली. दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ सुरू असलेल्या आंदोलनाला आणि आमरण उपोषणास बसलेल्या सोनम वांगचुक यांना समता सैनिक दलाने नैतिक पाठिंबा जाहीर केला असून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर केंद्र सरकारने संवेदनशीलतेने संवाद साधून तातडीने निर्णय घ्यावा, असे आवाहन केले आहे.
यावेळी समता सैनिक दलाचे मुख्य मार्गदर्शक भदंत नाग दीपांकर महास्थविर, राष्ट्रीय अध्यक्ष डी. एफ. कोचे, राष्ट्रीय जीओसी डॉ. प्रदीप डोंगरे, अतिरिक्त महासचिव अमर दीपांकर, प्रशिक्षण प्रमुख संघप्रिय नाग (लाडे), वरिष्ठ कमांडर पृथ्वी मोटघारे, नागपूर जिल्हा जीओसी प्रमोद खांडेकर, बी. एम. बागडे आणि सिद्धार्थ मेश्राम आदी उपस्थित होते.

# खुल्या युवा कराटे स्पर्धेत किंग्स स्पोर्ट्स अकादमीची २३ पदकांची कमाई

**नागपूर :** एनएमसी क्रीडा संकुल, कोराडी स्टेडियम येथे झालेल्या खुल्या युवा कराटे चॅम्पियनशिप-२०२६ मध्ये शोतोकान कराटे इंटरनॅशनल ऑफ इंडिया, नागपूरद्वारे संचालित किंग्स स्पोर्ट्स अकादमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत काता व कुमिते प्रकारात एकूण २३ पदकांची कमाई केली.
स्पर्धेत नागपूरातील विविध भागांतील सुमारे ३५९ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अकादमीच्या १७ खेळाडूंनी स्पर्धेत भाग घेतला. तन्मय राजेश गेडामने एक सुवर्ण व एक कांस्य, राजरत्न भैसारेने एक सुवर्ण, रिद्धी लोकाडेने एक सुवर्ण व एक रौप्य, सिद्धांत दरवाडेने एक सुवर्ण, ऋतुषा जांभूळकर व वैदिक इल्मे यांनी प्रत्येकी एक रौप्य व एक कांस्य पदक पटकावले. याशिवाय करण खांडेकर, दक्ष सूर्यवंशी, प्रियांश गणवीर, मेधांश इल्मे, सौम्य अंबाडे, ऋषिका डोंगरे, त्रिशा भीमटे, आराध्या दुबे, प्रियांशी जाधव, सावी माटे आणि आमिर काझी यांनीही पदकांची कमाई केली.
स्पर्धेदरम्यान विदिशा दीपक भैसारे, उमंग टेंभरे आणि विद्या दहाटे यांनी रेफरी व पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल आयोजकांनी त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला.
या यशाचे श्रेय खेळाडूंनी मुख्य प्रशिक्षक सेंसेई कृष्णा भलावी व सहाय्यक प्रशिक्षक विदिशा भैसारे यांना दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशनचे अध्यक्ष शशिकांत हुमणे, कोषाध्यक्ष बी. टी. वाहणे आणि वरिष्ठ कराटे प्रशिक्षक सेंसेई मयूर बडगे यांनी विजेत्यांचे अभिनंदन करून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी कराटे प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# दहा दिवसीय महिला उपासिका प्रशिक्षण शिबिराचा समारोप



**नागपूर :** दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) पश्चिम जिल्हा महिला शाखेच्या वतीने बोधिसत्त्व नागार्जुन बुद्ध विहार, भगवती नगर येथे ५ ते १४ जुलै दरम्यान आयोजित दहा दिवसीय महिला उपासिका प्रशिक्षण शिबिराचा समारोप उत्साहात झाला.
समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उज्वला रामटेके होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून भन्ते बी. राहुल बोधी (मुंबई) उपस्थित होते. तसेच सुधाकर मेश्राम, इंदु रामटेके, सुजाता रामटेके, विजय मेश्राम, सुधा मेश्राम, आशा वानखेडे, सुरेंद्र मुन आणि देवानंद वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरार्थींनी प्रशिक्षणातून मिळालेल्या धम्मज्ञानाचे अनुभव मांडत सामाजिक व धार्मिक अंधश्रद्धांपासून दूर राहण्याचा आणि धम्मप्रसारासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. यानंतर शिबिरार्थींची परीक्षा घेऊन सर्वांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण केले आहे.
कार्यक्रमाचे संचालन हर्षिका बलवीर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अभिका मोटघरे यांनी केले. शेवटी भन्ते बी. राहुल बोधी यांनी धम्मदेशना व आशीर्वाद देऊन कार्यक्रमाची सांगता केली.

# सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला संविधाननिष्ठ मराठी साहित्यिकांचा पाठिंबा



**नागपूर :** भारतीय शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून संविधानाने दिलेले शैक्षणिक अधिकार सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावेत, राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता यावी आणि नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागण्यांसाठी शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरण अभ्यासक सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला संविधाननिष्ठ मराठी साहित्यिक, विचारवंत आणि कलावंतांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.
प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, अभिजीत दिपके आणि सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी सुरू केलेले आंदोलन हे शैक्षणिक क्षेत्रातील नव्या प्रतिरोधाचे प्रतीक असून विद्यार्थ्यांमध्ये संघर्षाची प्रेरणा निर्माण करणारे आहे. लोकशाहीत सरकारविरोधी आवाज दडपण्याच्या प्रवृत्तीच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन महत्त्वपूर्ण असून सरकारने आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने तोडगा काढावा आणि सोनम वांगचुक यांचे उपोषण सोडवावे, अशी मागणी केली आहे.
या पत्रकावर ज्येष्ठ साहित्यिक यशवंत मनोहर, लक्ष्मण माने, लक्ष्मीकांत देशमुख, नागोराव कुंभार, प्रल्हाद लुलेकर, उत्तम कांबळे, अशोक बाबर, प्रेमानंद गज्वी, दागो काळे, पी. विठ्ठल, संदीप सारंग, माधव सरकुंडे, उत्तम अंभोरे, गंगाधर अहिरे, अरविंद सुरवाडे, रणधीर शिंदे, भरत यादव, मिलिंद कसबे, अशोक पळवेकर, प्रमोद वाळके, शैलेंद्र लेंडे, वंदना महाजन, युवराज गंगाराम, रविंद्र इंगळे चावरेकर, प्रकाश राठोड, युवराज सोनटक्के, मनोहर नाईक, अनमोल शेंडे, प्रमोद नारायणे, प्रशांत वंजारे यांच्यासह अनेक साहित्यिक, विचारवंत आणि कलावंतांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# 'लोकसंख्या व्यवस्थापन : शिक्षण आणि विकास' या विषयावर मुक्त विद्यापीठ यशवाणी वेब रेडीओवर ज्ञानसत्र



**नाशिक :** जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त 'लोकसंख्या व्यवस्थापन : शिक्षण आणि विकास' या विषयावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडीओवर विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे ज्ञानसत्र संपन्न झाले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची संकल्पना व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सदर ज्ञानसत्र घेण्यात आले. अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या ज्ञानसत्राचे समन्वयन केले. त्यात सहभागी प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी 'लोकसंख्या : विकासाचा पाया की आव्हान?' या मुद्द्याचे विस्तृत विवेचन केले. द्वितीय सहभागी डॉ. सुनील भारोडकर यांनी 'लोकसंख्या व राष्ट्रीय मानवी शक्ती' हा मुद्दा अधोरेखित केला. डॉ. विशाल आंबेडकर यांनी अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकसंख्यावाढीचा आढावा सादर केला. परिसंवादात लोकसंख्या वाढ, वाढते शहरीकरण, आधुनिक जीवनशैली, महानगरांची वाढ, आरोग्यसेवा, शिक्षण, विकास प्रक्रियेवरील प्रभाव याविषयी सांगोपांग चर्चा करण्यात आली. राजू रसाळ यांनी महाकवी वामनदादा कर्डक यांची 'माणसा इथे मी तुझे गीत गावे' ही कविता सादर केली. हा कार्यक्रम अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यापीठ दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जयदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रज्ञ प्रकाश सापनर, गिरीश गवळी आणि दीपक राजगिरे यांनी विशेष योगदान दिले.

# स्मृती विद्यालयात बालहक्क जनजागृती कार्यक्रम




**ब्राम्हणी :** तालुका विधी सेवा समिती, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळमेश्वर यांच्या वतीने स्मृती विद्यालय, ब्राम्हणी येथे 'Right to Children, Right to Education' या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
कार्यक्रमाला कळमेश्वर न्यायालयाचे सहायक न्यायाधीश मांडवे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना बालहक्क, बालसंरक्षण तसेच बालगुन्हेगारीची कारणे, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय आणि कायद्याचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी ॲड. हर्षल यावलकर यांनी विविध कायदे व विद्यार्थ्यांचे हक्क याविषयी माहिती दिली. ॲड. आकाश काळे यांनी कायद्याचे शिक्षण, न्यायव्यवस्था आणि कायद्याचे ज्ञान प्रत्येक नागरिकासाठी किती आवश्यक आहे, यावर प्रभावी मार्गदर्शन केले.
स्मृती विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक तागडे यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यात एलएलबीसारख्या विधी शिक्षणाच्या अभ्यासक्रमांकडे वळून समाजसेवा व न्यायव्यवस्थेत योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.
कार्यक्रमाचे संचालन रामभारोसे परतेकी यांनी केले, तर आभारप्रदर्शन दिगांबर निस्ताने यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी मांडवे यांनी शाळेची पाहणी केली. शाळेतील ग्रंथालयातील पुस्तकसंपदा वाढविण्यासाठी त्यांनी ३,००० ची देणगी जाहीर करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. हा जनजागृती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्मृती विद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648